विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/मंगळवार दि. ३ सप्टेंबर २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१११ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


**सुविचार**

यदि हम यह यथार्थ रीति समझ लें कि युद्ध मनुष्यों के मन में पैदा होते हैं, तो हम मानसिक शान्ति के लिए और अधिक प्रयास करेंगे।

## केंद्र सरकारचा शेतकरी अन् कृषी क्षेत्रासाठी मोठा निर्णय, १३ हजार ९६० कोटींच्या ७ योजनांना मंजुरी

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट बैठकीत कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आणि शेतकऱ्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी मोठा निर्णय घेण्यात आला. शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी ७ योजनांना मंजुरी देण्यात आली. डिजिटल कृषी मिशन, अन्न व पोषणघटकांच्या सुरक्षेसाठी कृषी विज्ञान, कृषी शिक्षण, व्यवस्थापन, सामाजिक शास्त्रांना भक्कम करणे,शाश्र्वत पशुधनाचं आरोग्य आणि उत्पादन,फळशेतीचा शाश्र्वत विकास, कृषी विज्ञान केंद्राला प्रोत्साहन, नैसर्गिक साधन संपत्तीचं व्यवस्थापन अशा सात योजनांना केंद्र सरकारनं मंजुरी दिली आहे. कोणत्या योजनांना किती निधी ? डिजिटल कृषी मिशनला केंद्र सरकारनं २८१७ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी दिली आहे.



अन्न व पोषणघटकांच्या सुरक्षेसाठी कृषी विज्ञान यासाठी ३९७९ कोटी रुपये मंजूर करण्यात आलेत. कृषी शिक्षण, व्यवस्थापन, सामाजिक शास्त्रांना भक्कम करणे यासाठी २२९१ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे.

पशुधनाचं शाश्र्वत आरोग्य आणि उत्पादन या योजनेसाठी १७०२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. फळशेतीचा शाश्वत विकास या योजनेसाठी ८६० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. कृषी विज्ञान केंद्राला प्रोत्साहन देण्यासाठी १२०२ कोटी रुपये मंजूर करण्यात आलेले आहेत.

नैसर्गिक साधन संपत्तीचं व्यवस्थापन यासाठी ११९५ कोटी रुपये मंजूर करण्यात आलेले आहेत. कृषी क्षेत्र आणि शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी एकूण १३९६० कोटी रुपयांच्या योजनांना मंजुरी देण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या कॅबिनेट बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत माहिती दिली. आजच्या कॅबिनेट बैठकीत शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी ७ मोठे निर्णय घेण्यात आल्याचं त्यांनी म्हटलं. डिजिटल कृषी मिशन अंतर्गत शेतकरी नोंदणी, ग्रामीण जमीन नकाशा नोंदणी, पीक पेरा नोंदणी, कृषी निर्णय आधारभूत यंत्रणा, दुष्काळ आणि पूर नियंत्रण, हवामान, सॅटेलाईट डाटा, भूमिगत (पान ४ वर)

## रिफ्लेक्ट ऑर्बिटल देणार रात्रीहि सूर्यप्रकाश

नवी दिल्ली : - रात्रीसुद्धा सूर्य प्रकाश मिळाला तर? परंतु हा चमत्कार एका स्टार्टअपने केला आहे. यामुळे रात्री चंद्राऐवजी सूर्याची किरणांचा प्रकाश दिसू लागेल. कॅलिफोर्नियामधील स्टार्टअप कंपनी रिफ्लेक्ट ऑर्बिटल अंतराळात उपग्रह सोडून त्या माध्यमातून सूर्याचा प्रकाश पृथ्वीवर आणण्याची योजना बनवली आहे. दिवसा हा उपग्रह सूर्यप्रकाश संग्रहीत करेल आणि रात्रीच्या वेळी तो पृथ्वीवर पाठवणार आहे.

रिफ्लेक्ट ऑर्बिटल कंपनीची योजना अंतराळात उपग्रह लॉन्च करण्याची आहे. त्या माध्यमातून सूर्य प्रकाश पृथ्वीवर पाठवण्यात येणार आहे. रिफ्लेक्ट ऑर्बिटलचे सीईओ बेन नोव्हाक यांनी सांगितले की, सूर्य दिवसाच नाही तर रात्रीसुद्धा तुम्हाला प्रकाश देणार आहे. या योजनेला नाव 'सनलाइट ऑन डिमांड' असे आहे. यामुळे सूर्य प्रकाश दिवसा आणि रात्रीच्या बंधनातून मुक्त होणार आहे. ५७ लहान उपग्रह पाठवणार : लंडनमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत बोलताना बेन नोवाक यांनी सांगितले की, आता उर्जे साठी दिवस उजाडण्याची वाट पाहावी लागणार नाही. जेव्हा लागेल तेव्हा प्रकाश उपलब्ध होणार आहे. हा पर्याय अजेय शक्ती ठरणार आहे. मानवतेसाठी हा पर्याय मैलाचा दगड ठरणार आहे. त्यासाठी जवळपास ५७ लहान उपग्रह लॉन्च करण्याची तयारी केली जात आहे. हे उपग्रह ६०० किलोमीटर उंचीवर परिभ्रमण करणार आहेत. स्टार्टअपमध्ये सात जणांची टीम या योजनेवर काम करत आहे. या स्टार्टअपने त्यासाठी लागणारी चाचणी पूर्ण केली आहे. आता २०२५ मध्ये उपग्रह अवकाशात पाठवण्याची योजना बनवली जात आहे. या कंपनीचे को-फाउंडर आणि सीईओ बेन नोव्हाक आहेत. दुसरे को-फाउंडर आणि सीटीओ त्रिस्टन सेमेलहॅक आहेत. रिफ्लेक्ट ऑर्बिटलची ही कल्पना चमत्कारासारखी आहे. यापूर्वी रशियानेही (पान ४ वर)

### राजकीय फायद्यासाठी जात जनगणना करू नये; सुनील आंबेकर

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या अगोदरपासून काँग्रेसने देशात जातीय जनगणेची मागणी लावून धरली आहे. आता यावर आरएसएसने देखील भाष्य केले आहे. निवडणुकीचा लाभ मिळवण्यासाठी किंवा राजकीय फायद्यासाठी जात जनगणना करू नये. हिंदू धर्मात जात ही संवेदनशील बाब आहे. याचा निवडणुकीपुरता विचार होऊ नये. कोणाच्या प्रगतीसाठी आवश्यक असेल तर जात जनगणना झाली पाहिजे, असे विधान राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रसिद्धी प्रमुख सुनील आंबेकर यांनी केले आहे. तर आरएसएसचा जातीय जनगणेला उघड विरोध असून, त्यांना देशातील अल्पसंख्यांना हक्क द्यायचे नाहीत, असा आरोप काँग्रेसने केला आहे.

देशात गेल्या काही दिवसांपासून जातीय जनगणेची मागणी होत आहे. लोकसभा निवडुकीच्या अगोदरपासून काँग्रेस देशभरात जात जनगणनेची मागणी करत आहे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एसी, एसटी आणि ओबीसी साठी ५० टक्के आरक्षण मयार्दा ओलांडण्याचे आश्र्वासन दिले आहे. दरम्यान, सुनील आंबेकर यांनी म्हटले की,जातीची जनगणना हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. त्यामुळे समाजाची एकता आणि अखंडता धोक्यात आली (पान ४ वर)

## भाजपामध्ये माझा प्रवेश झाला, पण घोषणाच नाही

जळगाव : ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी राष्टवादी शरद पवार गटातून पुन्हा एकदा भाजपामध्ये घरवापसी करण्याचा निर्णय घेतला होता. लोकसभा निवडणुकीनंतर एकनाथ खडसे यांची भाजपा घरवापसी होईल, अशी चर्चा होती. मात्र आता एकनाथ खडसे यांनी भाजपामध्ये माझा प्रवेश झाला, पण घोषणा झाली नाही, असा मोठा गौप्यस्फोट केला आहे. यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. एकनाथ खडसे म्हणाले की, भाजपमध्ये आपला प्रवेश करण्यात यावा, अशी विनंती आपण भाजपाकडे केली होती. मात्र, भाजपाकडून पूर्ण प्रतिसाद मिळाला नाही. मी अजूनही राष्ट्रवादीचा आमदार आहे आणि शरद पवार यांनी मला राजीनामा देण्यास नकार दिला आहे. मी भाजपाकडून प्रतिसादाची अजून काही दिवस वाट पाहील आणि नंतर माझ्या मूळ राष्ट्रवादीमध्ये सक्रिय होणार असल्याचे खडसे यांनी म्हटले आहे.

आता भाजपमध्ये राहणे उचित होणार नाही भाजपामध्ये जाण्याची माझी इच्छा होती. माझ्या काही अडचणी होत्या. त्या मी जयंत पाटील यांना सांगितल्या होत्या. मात्र, भाजपाकडून प्रतिसाद मिळू शकला नाही. त्यामुळे मला आता माझ्या राजकीय भवितव्याचा विचार करावा लागेल, असा इशाराच त्यांनी यावेळी दिला आहे. जे पी नड्डा यांच्या उपस्थितीत माझा भाजपा प्रवेश करण्यात आला. मात्र, त्याला खालील लोकांनी विरोध केल्याने तो जाहीर होऊ शकला नाही, असा गौप्यस्फोट एकनाथ खडसे यांनी केलाय. तसेच आता भाजपामध्ये राहणे उचित होणार नसल्याचे सांगत एकनाथ खडसे यांनी आपण राष्ट्रवादी पक्षातच राहणार असल्याचे संकेत दिले आहेत. खडसे गोंधळलेल्या अवस्थेत : प्रवीण दरेकर याबाबत (पान ४ वर)

### लातूर जिल्ह्यात गेल्या चोवीस तासात सरासरी ६८.३ मि.मी. पावसाची नोंद

लातूर,/ प्रतिनिधी- जिल्ह्यात आज, २ सप्टेंबर रोजी सकाळी ८.०० वाजेपर्यंत मागील २४ तासांत सरासरी ६८.३ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. तर जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी ६७६.१ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

जिल्ह्यात २ सप्टेंबर, २०२४ रोजी सकाळी ८.०० वाजेपर्यंत मागील २४ तासांत झालेला पाऊस मिलीमीटरमध्ये तालुकानिहाय पुढीलप्रमाणे आहे. यात कंसांत दिलेले आकडे हे आतापर्यंत पडलेल्या एकूण पावसाचे आहेत.

लातूर- ५८.० (६४८.४) मि.मी., औसा- ४२.८ (६५२.५) मि.मी., अहमदपूर- (पान ४ वर)

## जिल्ह्यात पावसामुळे झालेल्या नुकसानीचा पालकमंत्र्यांनी घेतला आढावा पंचनामे तातडीने करण्याच्या सूचना

लातूर, दि. २ : जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचा पालकमंत्री गिरीश महाजन यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा घेतला. नुकसानीचे पंचनामे तातडीने करून त्याचा अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या. तसेच नदीकाठच्या गावांमध्ये विशेष खबरदारी घेण्याच्या आणि सर्व अधिकाऱ्यांनी फिल्डवर राहून तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रमेश जाधव यांच्याकडून पालकमंत्री श्री. महाजन यांनी नुकसानीचा आढावा घेतला.

एकाच दिवशी इतक्या मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने पिकांचे नुकसान झाले आहे, या नुकसानीचे पंचनामे त्वरीत सुरू करून नुकसानीची अचूक माहिती संकलित करावी. एकाही शेतकऱ्याचे नुकसान यामधून सुटणार नाही, याची दक्षता घ्यावी. यासोबतच घरांची पडझड, जनावरे दगवण्यासारखे प्रकार घडले असल्यास संबंधितांना त्वरीत मदत उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी. मनुष्यहानी टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने हाती घ्याव्यात. नदीकाठीच्या गावांमधे विशेष खबरदारी घ्यावी, अशा ठिकाणी पूरपरिस्थिती हाताळण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज ठेवावी, अशा सूचना पालकमंत्री (पान ४ वर)



नाथ संस्था औसा येथेलातूरचे माजी नगराध्यक्ष विक्रमसिंह चौहाण व प्रा. रामेश्वर बहर यांचा ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सत्कार करुन आशिर्वाद दिला.

### शीतल चापोलीकर यांचे यश



अहमदपूर / प्रतिनिधी- श्री. विलास चापोलीकर यांची कन्या कु. शीतल चापोलीकर यांचा एम.डी.एस.Endo (P.G.) साठी HKS College, गुलबर्गा येथे प्रवेश मिळाला आहे. सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

दै. यशवंतच्यावतीने त्यांचे हार्दीक हार्दिक अभिननंदन.

## मांजरा परिवार विश्वासार्हतेचा लोकप्रिय ब्रँड



**लातूर / प्रतिनिधी-** माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या पुढाकारातून स्थापन झालेल्या मांजरा परिवारातील सर्व साखर कारखाने बँका आणि इतर संस्थानी प्रयोगशील राहून शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य जनतेच्या जीवनात परिवर्तन घडवण्याचा उद्देश साध्य केला आहे, त्यामुळे मांजरा हा विश्वासहारतेचा ब्रँड तयार झाला आहे, ही विश्वासार्हता कधीही कमी होऊ दिली जाणार नाही असा विश्वास, माजी मंत्री, दिलीपराव देशमुख यांनी विलास सहकारी साखर कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत बोलताना व्यक्त केला.

विकास कारखान्याच्या अध्यक्षा आदरणीय वैशालीताई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली नेवळी येथील कारखाना साइटवर कारखान्याची २२ वी सर्वसाधारण सभा आज अत्यंत खेळीमळीच्या वातावरणात पार पडली या सभेत या सभेत मांजरा परिवाराचे आधारवड दिलीपरावजी देशमुख यांचा डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजिस्ट संस्थेकडून पुरस्कार मिळाल्याबद्दल तसेच लातूर जिल्हा बँकेच्या अध्यक्ष आमदार धीरज देशमुख आणि लातूरचे नवनिर्वाचित खासदार डॉ शिवाजी काळगे, धाराशिवचे खासदार ओमप्रकाश निंबाळकर यांचा या सभेत यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, लातूरचे नवनिर्वाचित खासदार डॉ शिवाजी काळगे, धाराशिवचे खासदार ओमप्रकाश निंबाळकर, लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, रीड लातूरच्या संस्थापीका दिपशिखा धिरज देशमुख, माजी आमदार वैजनाथ शिंदे, कारखान्याचे व्हा. चेअरमन रवींद्र काळे, कार्यकारी संचालक संजीव देसाई, युनिट २ चे कार्यकारी संचालक ए.आर. पवार, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन श्रीशैल उटगे, रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जे राव मोरे, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हॉइस चेअरमन समद पटेल, श्रीपतराव काकडे, सचिन पाटील, संभाजी सुळ, अभय साळुंके, अजित माने, कल्याण (पान ४ वर)




# लातूर येथील मेळावा ऐतिहासिक व्हावा - नवनाथ वाघमारे

लातूर / प्रतिनिधी- आज लातूर येथे ओबीसी, व्हीजेएनटी, एस.बी.सी, भटके विमुक्त यांचा सर्वपक्षीय महाएल्गार जिल्हास्तरीय मेळाव्या आयोजन संदर्भात आयोजित सवांद बैठक राज्यातील ओबीसी नेते श्री नवनाथजी वाघमारे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडली. या बैठकीत लवकरच विधानसभा निहाय व जिल्हास्तरीय ओबीसी महाएल्गार मेळावा आयोजन करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. या मेळाव्यास राज्यातील सर्व प्रमुख ओबीसी नेत्यांना निमंत्रित करण्यात येणार आहे.

राज्यातील सध्याची सामजिक आणि राजकीय परिस्थिती पाहता ओबीसी, भटके विमुक्त, एस बी सी जाती घटकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. गाव गाड्यांमध्ये राहणारा समाज प्रचंड दडपणाखाली आहे. महाज्योती संस्थेस पुरेसा निधी मिळत नाही. विद्यार्थांना स्कॉलरशिप प्रलंबित राहिलेली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भविष्यात मूळ ओबीसींना प्रतिनिधित्व मिळणार नाही अशीही भीती समाजात निर्माण झालेली आहे. यासर्व बाबींना वाचा फोडण्यासाठी महायलगार मेळाव्याचे आयोजन केले जाणार असून राज्यातील सर्वच प्रमुख ओबीसी नेत्यांना निमंत्रित करण्यात येणार आहे. यावर आजच्या बैठकीत विचार मंथन झाले. येणाऱ्या काळात जिल्ह्यातील सर्व गाव खेड्यांमध्ये जावून या मेळाव्याच्या आयोजनाची जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्वप्रथम औसा येथे हा मेळावा संपन्न होणार आहे त्यानंतर जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा निहाय मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत आणि याची सांगता लातूर येथे जिल्हास्तरीय महामेळावा आयोजन करून करण्यात येणार आहे. ओबीसी महाएल्गार मेळावा केवळ ओबीसी समाजच नव्हे तर अठरा पगड, बारा बलुतेदार, भटके विमुक्त, मुस्लिम ओबीसी समाजातील नागरिक सहभागी होणार आहेत. तरी सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने पक्षभेद विसरून सर्वपक्षीय ओबीसी महयलगार मेळाव्यात सहभागी व्हावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. लातूर येथे पार पाडणारा मेळावा राज्यात दिशादर्शक आणि ऐतिहासिक ठरावा असे आवाहन ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी यावेळी बोलताना केले.

या बैठकीच्या प्रारंभी वडीगोद्री येथे प्रा लक्ष्मण जी हाके यांच्या समवेत उपोषण करणारे नवनाथजी वाघमारे यांचा लातूर जिल्ह्यातील ओबीसींच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ड गोपाळ बुरबुरे, रघुनाथ मदने, आयुब मणियार, प्रा सुभाष भिंगे हरिभाऊ गायकवाड, प्रा संतोष वीरकर, राजेंद्र वनारसे, पद्माकर वाघमारे, सुधीर पोतदार, नरसिंह भिकाने, विजयकुमार पिनाटे, भारत काळे, श्रीकांत मुद्दे, सुदर्शन बोराडे, विष्णू बानापुरे, डॉ एच जी निंबाळकर, अनिल जाधव, श्याम गोरे, राम कांबळे, ड नितीन म्हेत्रे, कालिदास माळी, सुधाकर माळी, दगडूसाहेब पडिले, संजय क्षीरसागर, अॅड. बालाजी गाडेकर, पांडुरंग माळी, हनुमंत कांबळे, सुधाकर लोकरे, चांगदेव माळी, विनोद कुंभार, योगेश लदूरे, सतीश काप्रे, पांडुरंग बनसोडे, उद्धव काळे, भागवत चिंते, विशाल वाघमारे युवराज चव्हाण, सचिन माळी, ज्ञानोबा मोगले ,शिवाजी पेठे, प्रल्हाद गड्डीमे, भागवत वंगे, शिवाजी कुंभार, अॅड दत्ता घोगरे, विष्णू कोळी, रणधीर हाके, विष्णु पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

ओबीसी, भटके विमुक्त, एस बी सी यांच्या नियोजित महाएल्गार मेळाव्याची सुरुवात औसा येथून होणार असून त्यानंतर सर्वच विधानसभा मतदारसंघात या मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे.



राज्यातील सध्या निर्माण होत असलेला आरक्षणाचा तिढा हा सर्व जाती घटकांमधील जातीय सलोखा बिघडवणारा ठरत आहे. त्यामुळे आरक्षण वाचविण्याची जबाबदारी घेण्यासाठी भटके विमुक्त, एसबिसी, लिंगायत, मुस्लिम, दलीत समजतील सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र यावे. लिंगायत समजातील वाणी हे ओबीसी मध्ये येतात परंतु त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी होतात. जुने महसुली दस्तावेज सरसकट तपासले गेल्यास याचा लाभ लिंगायत समाजातील हजारो नागरिकांना होणारा आहे. धनगर आणि धनगड या शब्दाचा तिढा निर्माण करून धनगर समाजास एस टी आरक्षणाची अंमलबजावणी केली जात नाही. कोळी समाजासही आरक्षणाचा लाभ मिळत नाही. दलीत समाजास नौकरी मधील बढती बंद करण्यात आली आहे. मुस्लिम समाज हा आर्थिक आणि सामाजिक सर्वात मागासलेला असताना त्यांना आरक्षण दिले जात नाही. त्यामुळे आरक्षणाच्या लढ्यात सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे.

# आचार विचार संगती यावरच मनुष्याची प्रतिमा ठरते: ज्ञानराज

**अॅड. शाम कुलकर्णी**

औसा / प्रतिनिधी- आचार विचार आहार विहार संस्कार संगती ज्ञान भाषा यावर मनुष्याची प्रतिमा स्वतःची प्रतिमा ठरते जो नित्यनेम साधनेतला माणूस आहे तो सहजपणे ओळखता येतो बाह्यांगापेक्षा अंतरंगातली भक्ती परमार्थ हा अनुभूती देतो.असे विचार ह भ प श्री ज्ञानराज महाराज यांनी व्यक्त केले.

नाथ मंदिरात श्रावण मासअनुष्ठानात नित्य सायंकाळच्या चक्रीभजन नंतर ग्रंथराज श्री ज्ञानेश्र्वरीच्या निरूपणात महाराज बोलत होते.१८ व्या अध्यायातील ९ व्या श्र्लोकातील ५,६,७,८, या ओव्या नरूप भक्तांशी विचार संवाद साधताना ते बोलत होते.

जो भक्तीमध्ये रममान आहे त्याला साधने करता सर्व काळ हा पर्वकाळच असतो नामस्मरण सेवा यासाठी ठराविक कालावधी दिवस महिना वर्ष वेळ याचे बंधन नसते ते केव्हाही कुठेही कसेही सतत देखील करता येऊ शकते

संतांनी भक्तिमार्ग साधना दिली



या अनुष्ठानाची उपासना आपणास दिली आणि अवघड परमार्थ सोपा सहजपणे करू शकता हा भरवसा दिला कोणत्याही प्रकारचा अडसर या भक्ती साधनेत नसतो, नाही, फक्त आपल्या अंतकरणात भक्तीभावाची ज्योत प्रज्वलित ठेवावी जे होईल जे करतील ते ईश्र्वराच्या परमेश्र्वराच्या मर्जीने होईल. हा विश्र्वास असावा आणि उपासनेत आपले जीवन प्रवाहित करावे म्हणजे प्रत्येक क्षण हा पर्वकाळ ठरेल आणि........ साधला हा पर्वकाळ गेला अंतरीचा मळ.... मग भगवंत कृपेस प्राप्त ठराल असे महाराज म्हणाले तसे कर्म तसे विचार जसे विचार तसे आचरण आपल्याकडून होते .

म्हणून पूर्वजांनी आपल्याला हा श्रावण मास अनुष्ठानचा हा प्रसाद दिलेला आहे तो भक्ती भावाने घ्यावा व आपल्या जीवनात आनंद समाधान आणि सुखाची प्राप्ती करून घ्यावी असे महाराज म्हणतात.

परंपरेची आजची सेवा धनंजय वसंतराव शिरसागर संतोष शिंदे तुळजापूर सुमन सुंदरराव शिंदे बळवंत घोगरे श्रीनिवास हैदराबाद सुरेखा ढोबळे लातूर गोविंद लहरे मसलगा राजुरी भाऊजी आदींनी गुरूचरणी रुजू केली.

## इराणच्या गावात ८२.२ अंशावर पारा

डेरेस्टन : - इराणमधील एक गाव होरपळत आहे. येथील तापमान केंद्राने २८ ऑगस्ट रोजी ८२.२ अंश सेल्सियस तापमानाची नोंद केली आहे. पृथ्वीवर सर्वाधिक नोंद करण्यात आलेले हे तापमान ठरले आहे. अमेरिकेचे हवामानतज्ञ कॉलिन मॅकार्थी यांनी 'एक्स'वर यासंबंधी माहिती दिली आहे. परंतु त्यांनी या तापमान नोंदीवर साशंकताही व्यक्त केली आहे, याप्रकरणी अधिकृत तपासणीची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. इराणच्या दक्षिण किना-यावरील डेरेस्टन वायुतळानजीक असलेल्या हवामान केंद्राने २८ ऑगस्ट रोजी १८० फॅरेनहाइट डिग्री (८२.२ सेल्सिअस) तापमान आणि ९७ फॅरेनहाइट डिग्री (३६.१ सेल्सिअस)चा ओस बिंदू नोंदविला आहे. या घटनेने पूर्ण जगातील हवामानतज्ञांची चिंता वाढली आहे.

# दृढविश्वास, प्रेम,नम्रता,सातत्य व ध्यासाशिवाय भक्ती टिकणार नाही

**अॅड. शाम कुलकर्णी**

औसा / प्रतिनिधी- मनाचा दृढसंकल्प,विश्वास,ध्यास, प्रेम,नम्रता आणि सातत्य याशिवाय भक्ती टिकून राहत नाही.....तर .. लटिका हा व्यवहार सर्व हा संसार वाया येरझार हरविण .... अशी भक्तीची अवस्था होऊन बसते त्याकरिता हृदयातून ती भावभक्ती हवी ज्यामध्ये प्रेम श्रद्धा ध्यास ध्यास हवे नित्यनेमाने नामस्मरण, जप, पारायण, भजन, चक्रीभजन ही साधना हवी. मग त्याची अनुभूती पहा तो सर्व समस्यांचे संकटाचे दोषांचे निवारण करील, व आपल्याला इच्छित फळ देईल हा विश्र्वास महाराजांनी व्यक्त केला.

औसा येथील नाथ मंदिरामध्ये श्रावणमास अनुष्ठानातील सायंकाळच्या चक्रीभजनानंतर ग्रंथराज श्री ज्ञानेश्र्वरीच्या प्रवचनात ते बोलत होते १८ व्या अध्यायातील ९ व्या श्र्लोकातील ५,६,७,८, या ओव्या वरील चिंतनात महाराज म्हणाले भक्तीसाठी काही एक लागत नाही, लागते ते प्रेम आणि भाव.... कारण... भावबळे आकळे एरव्ही न कळे.. असे माऊली म्हणतात तर ..... मनी नाही भाव अन देवा मला पाव अशाने देव भेटायचा नाही रे.. देव बाजारचा भाजीपाला नाही रे... असे संत तुकडोजींनी वाजवून सांगितले आहे.

आज जेवलात पोट भरते पण पुन्हा भूक लागते तसे एक दिवस नाम घेतले पूजा पाठ केला भजन केले तर चालेल का, नियमितता नित्यनेम त्यासाठी आवश्यक आहे आणि याकरिताच हे अनुष्ठान आहे. भक्ती प्रल्हादाची,भक्ती पुंडलिकाची,भक्ती राधेची भक्ति मिरेची, आणि साधना तप आणि समर्पण संतांचे त्यामुळे संतांची वचने आजही त्रिकाल सत्य आणि उद्धारक आहेत अशी महती महाराजांनी सांगितली भक्तीतील शक्ती ही कुठल्याही प्रसंगाला समर्थपणे सामोरे जाण्याची ताकद देते आत्मनिर्भर बनवून जीवनात सुख शांती समाधान सदैव लाभते असे महाराज शेवटी म्हणाले.

# सर्वत्र परमेश्वराची सत्ता

कोणताही अर्ज केलेला नसतो की कुणाचीहि शिफारस नसते. असे कोणतेहि असामान्य कर्त्तृत्वही नसते. तरीहि डोक्याच्या केसांपासून ते पायाच्या अंगठ्यापर्यंत २४ तास रक्त फिरते. जिभेवर नियमित अभिषेक असतोच.अखंडपणे हृदय चालू असतेच. चालणारे यंत्र ही फिट आहे. .पायाच्या नखापासून ते डोक्याच्या केसापर्यंत विनाअडथळा संदेशवहन करणारी प्रणाली कोणत्या अदृष्य शक्तीने चालते आहे काही समजत नाही. हाडांमासामध्ये तयार होणारे रक्त कोणते जगावेगळे आर्किटेक्चर आहे याचा मागमूसही लागत नाही. हजार हजार मेगापिक्सलवाले दोन दोन कॅमेरे अहोरात्र सगळी दृश्ये टिपत आहेत.

दहा दहा हजार टेस्ट करणारा जीभ नावाचा टेस्टर, अगणित संवेदनांची जाणीव करुन देणारी त्वचा नावाची सेन्सर प्रणाली , वेगवेगळया फ्रिक्वेंसीची आवाजनिर्मिती करणारी स्वरप्रणाली आणि त्या फ्रिक्वेंसीचे कोडींग डीकोडींग करणारे कान नावाचे यंत्र. पंचाहत्तर टक्के पाण्याने भरलेला शरीररुपी टँकर हजारो छिद्रे असतानाही कुठेही लिक होत नाही.

आधाराशिवाय ही आपण उभे राहू शकतो. गाडीचे टायर झिजतात, पण पायांचे तळवे कधीही झिजत नाही..अद्भुत अशी रचना आहे. संभाळणे, स्मृती, शक्ती, शांती आणि आत्मा हे सर्व असणारे शरीर अद्भूत ,अविश्वसनीय, अनाकलनीय आहे हे सर्व.

जीवाशिवाच्या खेळाचा निखळ, निस्वार्थी आनंदाचा वाटेकरी होण्याची सद्बुद्धी कृतज्ञता ऋणी असल्याचे स्मरण, चिंतन असावेच. गाढ झोपेतही हृदयाचे स्पंदन चालू रहाणे, श्वासोच्छ्वास चालू रहाणे, पचनक्रिया चालू रहाणे, खाल्लेल्या अन्नाचे रक्त निर्माण होणे, पृथ्वीतलावर पाणी निर्माण होणे, शरीरांतर्गत सर्व इंद्रियांनी शिस्तपूर्वक कामे करणे, अंतराळांतील प्रत्येक ग्रहगोलांनी भ्रमणकक्षा सांभाळणे, फुलांमध्ये सौरभ निर्माण होणे, बीजातून वृक्ष निर्माण होणे, पिलासाठी आधीच चाऱ्याची सोय निर्माण होणे, एवढ्याशा स्वरयंत्रातून अब्जावधी वेगवेगळे ध्वनी निर्माण होणे, दोन डोळे,दोन कान, एक नाक, दोन ओठ यातून निर्माण होणाऱ्या अवयवांतून एवढ्या विविधता निर्माण होणे, मेंदूत लक्षावधी आठवणी मुद्रित होणे, एकदा चालू झालेले हृदय शंभर वर्षे सुध्दा दिवसरात्र अविश्रांत स्पंदत रहाणे, बोललेल्या स्वरांचे ऐकणाऱ्याच्या मेंदूत बरोबर अर्थ उमजणे, सर्वत्र परमेश्वराची सत्ता जाणवते. परमेश्वर पहायचा नाही, ऐकायचा नाही, फक्त असा अनुभवायचा. अहंकार सोडून, निगर्वी होऊन आणि निःशंकपणे.

- सौजन्यः अशीष गुणाले.

## आश्चर्य

पोट दुखो, पाठ दुखो, हात दुखो, मान । डोकं दुखो, पाय दुखो, नाक दुखो, कान ।। काही झालं, तरी आपलं, औषध पोटात घ्यायचं ? । औषधाला कसं कळतं, कुठल्या गल्लीत जायचं ? ।।

जिथे दुखतं, तिथे कसं, हे औषध पोचतं ? उजेड नाही, दिवा नाही, त्याला कसं दिसतं ? हातगल्ली, पायगल्ली, पाठीचं पठार । छातीमधला मोठा चौक, पोटाचा उतार ।

फासळयांच्या बोळामधून, इकडेतिकडे वाटा । औषधाला कसं कळतं, कुठून जातो फाटा ? ।। लालहिरवे दिवे नाहीत, नाही पाटी, खुणा ! पोलीसदादा कुठेच नसतो, वाटा पुसतं कुणा ? ।।

आई, असं वाटतं की, इतकं लहान व्हावं । गोळीबरोबर पोटात जाऊन, सारं बघून यावं ।। आईनं गप्कन धरलं, म्हणे, बरी आठवण केली । आज तुझी आहेच राजा, मएरंडेल मची पाळी ।।

**- सौजन्य : डॉ अरुण शहा**

# श्री महादेव विद्यालयाच्या प्राध्यापिका मंजुषा बिराजदार सेवानिवृत्त मान्यवरांच्या उपस्थितीत सेवापुरती गौरव सोहळा संपन्न



वलांडी-देवणी तालुक्यातील धनेगाव येथील श्री महादेव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील एम. सी. व्ही. सी. इलेक्ट्रिकल्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा. बिराजदार मंजुषा धनराज यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा आज दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी उत्साहात संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष इंजिनियर अनिल मुळे हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पाणीपुरवठा जि. प. लातूर येथील कार्यकारी अभियंता शेलार बी. आर., म्हाडा मुंबई येथील माजी कार्यकारी अभियंता हनुमंतराव धनुरे, धनेगावचे माजी उपसरपंच रवींद्रकुमार पाटील, केशवराव विद्यालय लातूर येथील माजी मुख्याध्यापक उमेश शेलुकर, सेवानिवृत्त तहसीलदार शिंदे डी. एन., महादेव विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक सुधाकरराव देशमुख, बिराजदार धनराज, पडसलगे बंडेपा, प्राचार्य रामलिंगमुळे आधी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बी.आर. शेलार म्हणाले की मी धनेगावात दहा वर्षे राहिलो येथील प्रेमळ लोकांचा सहवास शाळेचे आजी माजी मुख्याध्यापक सर्व कर्मचारी यांनी मला खूप भरभरून प्रेम दिले हे मी आयुष्यात कधीही विसरू शकत नाही आणि मी त्यांच्या ऋणी शेवटपर्यंत राहू इच्छितो. शेवटी म्हणाले की माझी पत्नी मंजुषा हिचे संसारात खूप साथ मिळाले. म्हणून आमचे संसार आयुष्य फुलले. आणि मंजुषा हिला आरोग्य संपन्न दीर्घायुष्य लाभो ईश्वरचरणी प्रार्थना करतो. अध्यक्षीय समारोपप्रसंगी इंजिनियर अनिल मुळे यांनी प्रा. बिराजदार मंजुषा यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य रामलिंग मुळे यांनी केले. सूत्रसंचालन केसाळे बी.एस. यांनी केले. तर आभार शेटे आर.व्ही. यांनी मांनले. या कार्यक्रमाला कुलकर्णी पी.डी., पोलीस पाटील बंकट बोयने, मुरली बिरादार, प्रा बंडगर ए.एन., बालूरकर अशोक, प्रा कांबळे आर.एम., दिनकर आलमले, देशमुख मॅडम, बिरादार मॅडम, तसेच आजी-माजी विद्यार्थी, इष्टमित्र परिवार सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवरत्न पुरस्कार मिळणे म्हणजे मोठा सन्मान होणे : ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले

लातूर - सार्वजनिक जीवन जगत असताना सामाजिक बांधिलकीने जगणे महत्त्वाचे असते एखाद्याची प्रगती होत असताना त्यांचा आनंद स्वतःला होणे हे खऱ्या संताचे लक्षण आहे यालाच संत म्हणतात आणि आज विलासराव देशमुख साहेबांच्या स्मृतिदिन व लातूर मिशन वृत्तपत्राच्या आकरावा वर्धापन दिना निमित्त शिवरत्न पुरस्कार वितरण व गुणगौरव समारंभ होत आहे प्रत्येकाचे सुख दुःख जाणून घेणे, त्यावर उपाय शोधणे हे विलासरावांचे खास वैशिष्ट्य होते समोरच्यांना न मागता देणारे मोठ्या मनाचे नेते होते असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले अध्यक्षीय भाषणात म्हणाले. अशा बऱ्याच गोष्टींना उजाळा दिला याबरोबरच गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यासोबत सुद्धा आलेला अनुभव सांगितला. या दोन लोकनेत्याच्या आठवणीना उजाळा दिला प्रत्येक विषयाला हात घालून आपल्या खुमासदार शैलीत मनोगत व्यक्त करून उपस्थितांचे दाद मिळविली.

यावेळी विचार मंचावर उद्धाटक म्हणून खा.डॉ. शिवाजी काळगे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे तसेच प्रमुख उपस्थिती भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ऋषिकेश कराड, राष्ट्रीय संत संदेश पक्षाचे अध्यक्ष राजेंद्र वनारसे, निवृत्त अभियंता सुनंदा जगताप लातूर मिशनचे संपादक भारत जाधव उपस्थित होते. यावेळी यांनीही आपले विचार मांडले या शिवरत्न पुरस्कार वितरण व गुणगौरव सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरानी उपस्थिती लावली होती तसेच महिला वर्गासह प्रशासनातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अनाथ व गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकीची परंपरा वृत्तपत्राने जोपासली. सभागृह खचाखच भरलेले होते, संयोजकांना ऐनवेळी खुर्च्या वाढवाव्या लागल्या. लातूर मिशन वृत्तपत्र वर्धापन दिनाला भरभरून शुभेच्छा मिळाल्या.

आजच्या काळात समाजातील प्रत्येक घटकाला शोधून सन्मानित करण्याची गरज -खा. डॉ शिवाजी काळगे .

समाजामध्ये वावरत असताना प्रत्येकाने आपापल्या जबाबदारीने राहील्यास अराजकता माजणार नाही सर्वच घटकातील व्यक्तींना शोधून त्यांचा सन्मान करण्याची काळची गरज बनली आहे. यामुळे त्यांच्याकडुन आणखीन जबाबदारीने कार्य होते असे प्रतिपादन लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी यावेळी केले.

विलासरावजी देशमुख गोपीनाथरावजी मुंडे साहेब एकच नाण्याच्या दोन बाजू - ऋषिकेश कराड

प्रथम मीडियाच्या विचार मंचावर आमंत्रित करून बोलण्याची संधी दिली सर्व पुरस्कार प्राप्त त्याचे अभिनंदन करतो माझं जेवढे वय तेवढं त्याचे कार्य आहे लोकनेते विलासराव देशमुख साहेब गोपीनाथ मुंडे साहेब हे एकदाच जिल्हा परिषदेत सोबत एकदाच विधानभवनात तसेच दिल्लीत सुद्धा एकच वेळी जाणारे जिवलग मित्र होते असे चित्र आता महाराष्ट्रात पाहायला मिळणार नाही या दोन नेत्याची उंची खूप मोठी आहे आणि यांच्यावर मला बोलण्याची संधी या निमित्ताने मिळाली असे म्हणताच सभागृहात एकदम भावनिक वातावरण निर्माण झाले होते शिवरत्न पुरस्कार वितरण व गुणगौरव सोहळा प्रसंगी ऋषिकेश कराड यांनी या दोन्ही नेत्यांच्या कार्याला उजाळा दिला.

साहेबांच्या निधनापासून त्यांचे कार्य व विचारावरचा हा शिवरत्न पुरस्कार सोहळा -राजेंद्र वनारसे

गेल्या अकरा वर्षापासून नियमितपणे वर्धापन दिन व शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळा आयोजित होतो विलासराव देशमुख साहेब यांच्या विचाराने प्रेरित होऊन हा कार्यक्रम दरवर्षी यशस्वी होतो. यामुळे या शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळ्याचे महत्त्व खूप आगळे वेगळे आहे असे बरेच प्रसंग आपल्या भाषणात राष्ट्रीय संत संदेश पक्षाचे अध्यक्ष राजेंद्र वनारसे यांनी सांगितले.

दरवर्षी अशाच चांगल्या रत्नांचा गुणगौरव व्हावा - सुनंदा जगताप एखादी व्यक्ती आपले प्रामाणिक कर्तव्य निभावते ते कार्य करत असताना त्याचा कुठेतरी सन्मान होतो त्या सन्मानाचे पावती म्हणून पुरस्कार मिळतो यामुळे त्याच्या पाठीवर कौतुकाचे थाप पडते यामुळे त्यांच्या आणखीन जबाबदारी वाढते याबरोबरच पर्यावरणाचा सुद्धा विचार करून समतोल राखणे गरजेचे आहे दररोज झाडाचे संगोपन करा असा मोलाचा सल्ला सुनंदा जगताप यांनी उपस्थितांना दिला.

आपल्या कामाचे मूल्यमापन होत असते - भारत जाधव

गेल्या अकरा वर्षापासून लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांचा स्मृतिदिन व लातूर मिशन वृत्तपत्राचा वर्धापन दिन एक आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो आतापर्यंत १०० व्यक्तींना पुरस्काराने गौरविण्यात आले आहे यामुळे समाजात व प्रशासनात काम करणाऱ्या व्यक्तींना एक वेगळीच ऊर्जा मिळते याला



भरभरून प्रतिसाद मिळतो समाजात काम करताना आपल्या कामाचे मूल्यमापन होत असते असे आपल्या भाषणात लातूर मिशनचे संपादक भारत जाधव म्हणाले.

या वेळी सौ. मायाताई पाटील सरपंच ग्रामपंचायत नांदगाव, डॉ. पंजाब खानसोळे उपायुक्त मनपा लातूर, जगदिश कोकाटे विभागीय अभियंता रा.प.महामंडळ लातूर, हनुमंत बापू नागटिळक सामाजिक कार्य तथा उपसरपंच ग्रामपंचायत मुरूड, महेश हिप्परगे मंडळ अधिकारी कासारखेडा, ह.भ.प. सुनिल महाराज जवळे सांप्रदायिक क्षेत्र, अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त, राजन सरवदे गीतकार संगितकार कलाक्षेत्र, गोविंद महाके ग्रामसेवक ग्रामपंचायत शामनगर, विजयकुमार कावळे शैक्षणिक क्षेत्र जिजाऊ इंग्लीश स्कुल चिंचोली (ब.) सौ. संगिता बरूरे अध्यक्ष सखी महिला बचत गट लातूर पुरस्काराने मान्यवरांना उपस्थितीत गौरविण्यात आले तसेच मनाली पाटील, शेख बाशीद अव्वल कारकुन तहसील, गोविंद जगताप, महेश राठोड, दिपक बोराडे, दयानंद माने यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या वेळी उपसंपादक परमेश्वर घुटे, जिल्हा प्रतिनीधी गणेश स्वामी, सल्लागार - गणेश होळे, कैलास साळुंके, श्रीराम गायकवाड, गोविंद जगताप, दयानंद माने, कैलास ढोले, श्रीमंत होळे, विष्णु शिंदे, महेश राठोड, सादिक शेख, प्रा. बालाजी वाघमारे, उमेश भिसे, केदार वांगसकर, दिपक बोराडे पाटील, तुकाराम जोगदंड, ईश्वर बद्दर, अजित दुटाळ, बालाजी कांबळे, प्रदिप शिंदे, श्रीधर मसलकर, ओमकार सरडे, बालाजी इगोंले, अर्जुन लोखंडे, परमेश्वर माचवे, राजाभाऊ बोराडे, अमर जाधव, दयानंद लकडे, लखन सावंत, ऋषिकेश मोरे, मलबा, अलोक हासवले आदीं संयोजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अतिशय उत्कृष्ट पद्धतीने सूत्रसंचालन बालाजी कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन गणेश स्वामी यांनी मानले.

# यशवंत धाराशिव जिल्हा

मंगळवार दि. ३ सप्टेंबर २०२४ ३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com


## कै. पवनराजे स्मृती गुणगौरव पुरस्कार वितरणाचे आयोजन

धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – शिक्षण क्षेत्रातील उपक्रमशील शिक्षकांना २०२४ चा कै. पवनराजे स्मृती गुण गौरव पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन शिक्षक दिनी दि. ५ सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे. खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या कार्यालयात दुपारी तीन वाजता होणार आहे.
पुरस्कार वितरण शिक्षकचे बाळकृष्ण तांबारे व विक्रम पाटील यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ.कैलास पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून खा.ओमप्रकाश राजेनिंबाळकर, माजी नगराध्यक्ष मकरंद उर्फ नदुभैय्या राजेनिंबाळकर व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.नागनाथ धर्माधिकारी हे उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या कार्यालयात दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे या कार्यक्रमाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन कै. पवनराजे स्मृती गुण गौरव पुरस्कार समितीच्यावतीने करण्यात आले आहे.


# पर्यायी व्यवस्था होईपर्यंत एकही घर हलविणार नाही – आ. पाटील

धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – तुळजापूर तालुक्यातील तडवळा येथील नागरिकांच्या घरांची पर्यायी व्यवस्था होणार नाही. तोपर्यंत तुम्हाला राहत्या घरातून कोणीही हलवणार नाही, काळजी करू नका. पर्यायी घरांसाठी जिल्हा प्रशासन योग्य जागा शोधून देईल. तोपर्यंत तुम्हाला अडचणीत टाकून कुठलेही काम पुढे जाणार नाही असे आश्वासन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी देत तुळजापूर तालुक्यातील तडवळा येथील ग्रामस्थांना दिलासा दिला.
सोलापूर–तुळजापूर–धाराशिव या रेल्वेमार्गात तुळजापूर तालुक्यातील तडवळा येथील दलीत वस्तीसह गावातील काही घरे बाधित होत आहेत. आ पाटील यांनी तडवळा येथे जाऊन त्यांची भेट घेत त्यांच्या अडचणी व आस्थेवाईकपणे विचारपूस करीत त्यांना दिलासा दिला. जागेचा वाढीव मावेजा मिळवून द्यावा, राहण्याची पर्यायी व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी आ पाटील यांच्याकडे केली. विस्थापित कुटुंबांना पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याबाबत महसूल यंत्रणेला निर्देश दिले असल्याचे आ पाटील यांनी सांगितले. हा रेल्वेमार्ग पूर्ण करत असताना तडवळा येथील कोणत्याही नागरिकाचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेतली जाईल. दलीत वस्तीमधील ज्या नागरिकांची घरे रेल्वेमार्गासाठी संपादीत केली जाणार आहेत. त्यांच्या राहण्याची पर्यायी व्यवस्था होत नाही. तोपर्यंत कोणाचेही घर हलविले जाणार नसल्याचे आश्वासन त्यांनी दिले. शेतकरी आणि ग्रामस्थांच्या मागणीवरुन बाधित कुटुंबियांची भेट घेवून त्यांना दिलासा दिला. या नियोजित रेल्वेमार्गाच्या कामात गाव विस्थापित होणार, राहती घरे जाणार, या धास्तीने हवालदिल झालेल्या ग्रामस्थांची आस्थेवाईकपणे विचारणा करून त्यांना दिलासा दिला. यावेळी सरपंच ज्ञानेश्वर पांडगळे, विनोद गंगणे, माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, माजी नगरसेवक नानासाहेब लोंढे, उपसरपंच प्रवीण चंदनशिवे यांच्यासह तडवळा येथील रेल्वेबाधित कुटुंबिय, शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.



## अख्ख पीक डोळ्यादेखत गेले वाहून...

### शेतकऱ्याच्या तोंडातला घास हिरावला !



परंडा दि.२ (प्रतिनिधी) – परंडा तालुक्यात मुग व उडीद या पिकांची पेरणी मोठ्या प्रमाणात झाली आहे. चांगले उत्पन्न हातात येईल या अपेक्षेने शेतकरी धडपडत होता. परंतू निसर्गाला हे मान्य नव्हते. पावसान उघाड दिली, चांगल उन पडले म्हणून शेतकऱ्यांनी उडीद काढला. तोच पावसान दणका दिला आणि अक्षरशः सारच्या सार पीक पाण्यात वाहून गेले. तोंडातला घास गेला. अतोनात नुकसान झाले. या संकटात चव्हाणवाडीचा शेतकरी सापडला आहे. शासन शेतकऱ्याच्या मदतीला धाऊन येईल का ? एवढीच अपेक्षा करत शेतकरी याचना करत आहे. परंडा तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री व भूम – परंडा – वाशी तालुक्याचे विद्यमान आमदार यांनी तात्काळ पाहणी करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासन दरबारी तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

## विठ्ठलसाई साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांना सायबर क्राईम विषयी विशेष मार्गदर्शन

मुरूम दि. २ (प्रतिनिधी) – सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा कार्यक्रमांतर्गत नागरिकांना सायबर गुन्हेगारीबद्दल जागरूकता करून या समस्यातून दक्षता बाळगण्यासाठी मुरूम येथील विठ्ठलसाई साखर कारखाना येथे दि.१ सप्टेंबर रोजी
लातूर येथील श्री छत्रपती शाहू महाविद्यालयाची विद्यार्थिनी सहाना विभुते यांनी मार्गदर्शन केले. क्विक हिल फाउंडेशन व महाराष्ट्र सायबर मार्फत लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाच्यानवतीने शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्यात घेण्यात आला. यावेळी कारखान्यातील



कर्मचारी, कामगारांना सायबर क्राईम, मोबाईल फ्रौड, वेबसाईट लिंक आणि फेक स्कीमबद्दल जागरुक होण्याबद्दल सहाना विभूते यांनी सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी कारखान्यातील सर्व विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी व कामगार उपस्थित होते. या मार्गदर्शनामुळे उपयुक्त माहिती मिळाल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त करून आभार मानले.

## नुकसानीचे पंचनामे करून घ्यावेत – आ. पाटील

धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात सातत्याने पाऊस सुरू असून जिल्ह्यातील १६ महसूल मंडळामध्ये अतिवृष्टी झाली आहे. अतिवृष्टीने पिकांचे मोठे नुकसान होत असून अनेक ठिकाणी पिकात पाणी साठले आहे. स्थायी आदेशप्रमाणे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना सूचित केले असून त्यांनी संबंधितांना पंचनामे करण्याचे आदेशीत केले असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.
झालेल्या नुकसानीचे तलाठी यांच्याकडून पंचनामे




करून घ्यावेत. सततच्या पावसाने नदी – नाले तुडूंब वाहत असून अनेक पूलावरून पाणी वाहत आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क रहावे, काळजी घ्यावी. नदी काठच्या गावांनी विशेष काळजी घेण्याचे तसेच तात्काळ प्रशासनाला माहिती देण्याचे आवाहन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे. नैसर्गिक आपत्तीने ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना केंद्र, राज्य आपत्ती निवारण निकषाप्रमाणे अनुदानाची तरतूद असून सदरील रक्कम लवकरात लवकर मिळवून देण्यासाठी आपला प्रयत्न राहणार आहे.
तसेच ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा भरला आहे, त्यांनी पीक नुकसानीच्या सुचना ७२ तासांच्या आत देणे गरजेचे आहे. त्यामुळे नुकसानीची पूर्वसूचना देवून वस्तुनिष्ठ पंचनामे करून घ्यावेत व पडताळणी करूनच पंचनाम्यावर सही करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

## भिंतीच्या कोसळलेल्या डोलाऱ्याखाली २० शेळयां, ६५ कोंबड्या मृत्युमुखी

धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – पावसात मंदिराच्या मागील बाजुच्या भिंततीचा डोलारा पत्र्याच्या शेडवर कोसळून २० शेळ्या व ६५ कोंबड्या मृत्युमुखी पडल्या. तसेच शेडही उद्धस्त झाल्यामुळे या दुर्घटनेत शेळीपालन करणार्या विधवा महिलेचे सुमारे ५ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. ही दुर्दैवी घटना धाराशिव शहरातील सांजावेस भागात दि.१ सप्टेंबरच्या रात्री घडली आहे.
धाराशिव शहरातील सांजावेस भागातील अंबिका दत्ता दोडमिसे या विधवा असून त्या वडील वामन दशरथ लोणारी (मोळेकर) यांच्या घरी वास्तव्यास आहेत. त्यांनी बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेतून २ लाख ५० हजार रुपये कर्ज घेऊन शेळीपालन व कुकुट्ट पालन व्यवसाय सुरु केलेला आहे. दि. १ सप्टेंबरच्या रात्री झालेल्या पावसात त्यांनी शेळीपालन व कुकुट्टपालन करण्यासाठी उभारलेल्या पत्र्याच्या शेडवर मारुती मंदिराच्या पाठीमागील बाजुच्या भिंतींचा डोलारा कोसळला. या डोलाऱ्याखाली शेळ्या व कोंबड्यांचा दाबून जागीच दुर्दैवीरित्या मृत्यू झाला आहे. तसेच



१५ बाय ७० आकाराचे पत्र्याचे शेडही पूर्णतः उद्धस्त झाले आहे. यामुळे ५ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. दरम्यान दि.२ सप्टेंबर रोजी धाराशिव शहरचे तलाठी बालाजी लाकाळ यांनी पंचासमक्ष दुर्घटनेचा पंचनामा करुन तहसिलदारांकडे अहवाल सादर केला आहे. बँकेकडून कर्ज घेऊन सुरु केलेल्या व्यवसायावर निसर्गाचा प्रकोप झाल्याने विधवा महिलेवर आर्थिक संकट कोसळले आहे. या महिलेला संकटातून सावरण्यासाठी शासनाकडून भरीव मदत मिळावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## शिक्षण महर्षी सुभाषदादा कोळगे पतसंस्थेत पथ्वीराज कदम याचा सत्कार




धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – शिक्षण महर्षी सुभाषदादा कोळगे सहकारी पतसंस्थेचे सभासद व पानवाडीचे रहीवाशी सुभाष गणपती कदम यांचे सुपुत्र पथ्वीराज याचा डी.वाय. पाटील मेडिकल कॉलेज येथे एमबीबीएससाठी प्रवेश झाल्याबद्दल त्याचा संस्थेच्या कार्यालयात दि.२ सप्टेंबर रोजी शाल,पुष्पहार घालुन सत्कार करण्यात आला व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.
सुभाष कदम हे संस्थेचे संस्थापक सभासद असुन त्यांनी संस्थेचे संचालक म्हणुनही कार्यभार सांभाळलेला आहे. त्यांनी अतिशय प्रतिकुल परिस्थितीवर मात करीत पथ्वीराज याचा कोल्हापुर येथील डी.वाय.पाटील मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळविण्यात यश मिळविले. त्यांच्या या यशाबददल संस्थेच्यावतीने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिव व माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास कोळ्गे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे सभासद डॉ वसंत मुंडे, सुभाष कदम, प्रा. डॉ विलास रणसुरे, सौरभ रणसुरे, संदिप जेटीथोर, व्यवस्थापक शाम गंगावणे आदी उपस्थित होते.

## मुलीं–महिलांचा मोफत कराटे प्रशिक्षणास प्रतिसाद




धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – मुली व महिलांसाठी 'निर्भय बनो' मोफत कराटे प्रशिक्षणाचा प्रारंभ तुळजाभवानी स्टेडियमच्या सभागृहात करण्यात आला. पडत्या पावसाला सुद्धा न जुमानता पहिल्या दिवशी ६० मुली व महिलांनी स्वसंरक्षणाची खुणगाठ बांधली.
सक्षम व सकस समाज निर्माण करण्यासाठी व कसल्याही आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता या प्रशिक्षणातून निर्माण होणार आहे. त्यामुळे संपूर्ण २ महिने सर्व प्रशिक्षणार्थींनी दिलेल्या सूचनांनुसार प्रशिक्षण आत्मसात करावे असे आवाहन युवराज नळे यांनी केले. याला सर्वांनीच भरभरून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रशिक्षण दरम्यान पोलिस निरीक्षक थोरात, क्रीडा अधिकारी डिंपल ठाकरे, अजिंक्य वराळे, राजसिंह राजेनिंबाळकर, योगेश थोरबोले, वर्षा नळे यांनी भेट दिली. यावेळी प्रशिक्षक हरिदास रोकडे, राजेश महाजन, वैष्णवी सरडे, ऋतुजा खरे, योगिनी फुगारे, बुशरा तांबोळी व पालक उपस्थित होते.

## आ. चौगुले यांनी आरोग्य समस्या निवारणासाठी घेतली बैठक

उमरगा,दि.२ (प्रतिनिधी) –उमरगा लोहारा तालुक्यातील सध्या डेंग्यू व इतर आजारांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे नागरिकांना विविध आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे आ ज्ञानराज चौगुले यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांसोबत दि.२ सप्टेंबर रोजी आढावा बैठक घेतली.



उमरगा येथील तहसील कार्यालयात बैठकीत प्रशासनातील जिल्हा हिवताप संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकमेकांना सहकार्य करून प्रसंगाचे गांभीर्य ओळखून योग्य त्या तातडीच्या उपाययोजना आखण्यात याव्यात अशा सूचना आ चौगुले यांनी केल्या. या उमरगा व लोहारा तालुक्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील सर्व डबक्यातील पाण्याला मोकळ्या वाटा करून देऊन सर्व भागांतील स्वच्छता करण्यात यावी. डास निर्मूलनासाठी फवारणी युद्ध पातळीवर करून घेण्यात यावी. तसेच प्रत्येक नागरिकांनी त्यांच्या घर व परिसरात डासांची उत्पत्ती होऊ नये याची काळजी करून घेण्यासाठी हँडबिल व ध्वनी प्रेक्षकाद्वारे जनजागृती करावी अशा सूचना दिल्या. तसेच
शहरी व ग्रामीण भागांतील मोकळ्या प्लॉट धारकांनी त्यांच्या जागेची स्वच्छता स्वतः ठेवावी. तर संबंधित प्लॉट धारकांना नोटीस बजावण्याचे सुचित केले. या पुढील ग्रामीण व शहरी भागात आरोग्य विषयक तपासण्या वेगाने कराव्यात अशा सूचना आरोग्य अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीस युवा सेना विभागीय निरीक्षक किरण गायकवाड, उपविभागीय अधिकारी गणेश पवार, तहसिलदार गोविंद येरमे, मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर, मुख्याधिकारी सचिन भुजबळ, डॉ.विनोद जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सीमा बडे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.मारुती कोरे, सा.बां. विभागाचे शाखा अभियंता धीरज पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, अरुण जगताप, सुनील माने, पंढरीनाथ कोणे, आप्पासाहेब पाटील आदींसह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## जिल्हा काँग्रेसच्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरास मोठा प्रतिसाद

धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या बुथ प्रमुख, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ नेते विश्वास शिंदे व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धीरज पाटील यांच्या हस्ते दि.१ सप्टेंबर रोजी करण्यात आले. या शिबिरास कार्यकर्त्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.
धाराशिव शहरातील नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरासाठी पुणे येथील लोकायत संस्थेचे प्रशिक्षक जितेंद्र पापळे यांनी काँग्रेस विचारधारा तर उदय देशमुख यांनी बूथ व्यवस्थापन यावर सविस्तर मार्गदर्शन केले.
शिबिराच्या यशस्वितेसाठी




जिल्हा काँग्रेसचे मुख्य संघटक राजाभाऊ शेरखाने, वरिष्ठ उपाध्यक्ष सय्यद खलील, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील, मुकुंद डोंगरे, तुळजापूर तालुकाध्यक्ष रामचंद्र आलुरे, प्रकाश चव्हाण, धाराशिव तालुकाध्यक्ष विनोद वीर, उमरगा तालुकाध्यक्ष सुभाष राजोळे, परंडा तालुकाध्यक्ष हनुमंत वाघमोडे, भूम तालुकाध्यक्ष रुपेश शेंडगे, जिल्हा सरचिटणीस अशोक बनसोडे, डी.सी.सी. बँकेचे संचालक मेहबूब पटेल, शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, युवा नेते ऋषिकेश मगर, माजी नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे, ओबीसी विभागाचे जिल्हाध्यक्ष धनंजय राऊत, बाजार समितीचे संचालक उमेश राजेनिंबाळकर, सेवादलाचे जिल्हाध्यक्ष विलास शाळू, सचिव सुरेंद्र पाटील, सुजित हंगरगेकर, जुबेर शेख, नाना भोसले, विजयकुमार सोनवणे, महेश देशमुख, तनुजा हेडा, सुनील बडूरकर, सांस्कृतिक विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रेम सपकाळ, संजय गजधने, सलमान शेख, काकासाहेब सोनटक्के, समाधान घाटशिळे, विद्यार्थी काँग्रेसचे अध्यक्ष कफिल सय्यद, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष स्वप्नील शिंगाडे, युवक काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष धवलसिंह लावंड, सौरभ गायकवाड, गणेश सापते आदींनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीताने शिबिराची सांगता करण्यात आला. यावेळी जिल्हाभरातील काँग्रेसचे बूथ प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वकील संघाच्या उपस्थितीत सामूहिक बुध्द वंदना संपन्न

लातूर/ प्रतिनिधी- पु. भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या दर रविवार, चलो बुद्ध विहार या अभियाना अंतर्गत धम्मप्रचार मोहिमेला सशक्त करण्यासाठी लातूर शहरातील बौद्ध समाज विधिज्ञ संघ सहभागी झाले होते. ही सामूहिक वंदना नांदेड रोड स्थित राजा शुद्धोधन बुद्ध विहार संपन्न झाली.

तत्पूर्वी सर्व विधीज्ञ संघाच्यावतीने तथा पु. भिक्खु संघाच्यावतीने महामानवांच्या प्रतिमेला पुष्पाने, धुपाने तथा दीपाने अभिवादन करण्यात आले.

त्रिरत्न वंदना नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली बौद्ध धर्माची आचारसंहिता म्हणेजच बावीस प्रतिज्ञा व संविधान प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.



या वेळी धम्मदेसना देतांना पु. भिक्खु पय्यानंद थेरो म्हणाले की, समाजावर होत असलेले विविध प्रकारे जे अत्याचार होत आहेत, या अत्याचाराला न्यायालयामध्ये अशा प्रकरणाची भक्कमपणे बाजू विधिज्ञ संघ मांडत असतो. बहुतेक वेळा संघ असे प्रकरण विनामूल्य लढत असतो. निश्चितच ही स्तुत्य तसेच अभिनंदनिय बाब असल्याचे विधीज्ञ संघाप्रती गौरवोद्गार काढले. तसेच समाजातील दिवसेंदिवस अत्याचाराची मालिका थांबवायची असेल तर बुद्धिजीवी वर्गाने धम्म प्रचार आणि प्रसार करण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी झाले पाहिजे तथा सर्वांनी बुद्ध धर्म आचरणात आणावाच लागेल असेही प्रतिपादन या वेळी त्यांनी केले. यावेळी भंते बुध्दशील आणि भंते बोधीराज यांची प्रमुख उपस्थिती होती.

तदनंतर सर्व विधीज्ञ संघाचा महाविहार धम्मसेवक ग्रुपच्यावतीने राजा शुद्धोधन बुद्ध विहार ट्रस्टच्यावतीने सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल शिवरत्न पुरस्कार प्राप्त अशोक हनवते आणि रघुनाथ बनसोडे यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ऍडव्होकेट फोरमचे अध्यक्ष ॲड. लहू सुरवसे, ॲड.गणेश मधुकर कांबळे, ड. दीपक माने, ॲड. यशवंत चव्हाण, फोरमचे सल्लागार ॲड. शिवकुमार बनसोडे, ॲड. राजकुमार गंडले, ॲड. दीपक साठे, प्रसिद्धी प्रमुख ॲड. कृष्णा कांबळे तसेच सन्माननीय सदस्य ॲड. सुभेदार मादळे, ॲड. रोहित सोमवंशी, ॲड. रमेश गायकवाड, ॲड. सचिन दुर्गादास कांबळे व राजा शुद्धोधन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. आनंदजी सोनवणे व पदाधिकारी उमाकांत महालिंगे, राहुल शाक्यमुनी, चंद्रसेन भडके, करण ओव्हाळ, वसंत वाघमारे, गौतम सूर्यवंशी, सूर्यकांत दांडे, विक्रम चिकाटे, दगडू साळवे, हेमंत जाधव, विशाल कांबळे, दगडोजीराव सोनवणे, वसंत वाघमारे, धम्मरत्न सोनवणे, राजकूमार राऊत, राजकूमार कांबळे, उपासक व उपासिका यांची कार्यक्रमाला मुसळधार पाऊस कोसळत असताना ही मोठया संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क ऍड. आनंद सोनवणे यांनी केले, सूत्रसंचालन अनिरुद्ध बनसोडे, मिलिंद धावारे व आभार प्रा. डॉ. दुष्यंत कटारे यांनी मानले.

# मारोती मुंढे यांची देगलूर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक पदी नियुक्ती



देगलूर(प्रतिनीधी): देगलूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक विश्र्वनाथ झुंजारे यांची नांदेड पोलीस नियंत्रण कक्षात बदली झाल्यानंतर या ठिकाणी नायगांव पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक मारोती मुंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.तसा आदेश जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिला आहे.

काल रविवारी सायंकाळी मारोती मुंढे यांनी देगलूर पोलीस स्टेशन चा पदभार स्वीकारला. आज येथील मानव्य विकास विद्यालय चे मुख्याध्यापक संतोष कोल्हे,माजी नगराध्यक्ष सुजित कांबळे,बालाजी पिंडकुरवार, ज्येष्ठ पत्रकार शिवानंद स्वामी,संजय कल्याणी,पत्रकार मिलिंद हावरगेकर आदींनी नवनियुक्त पोलीस निरीक्षक मारोती मुंढे यांचा सत्कार केला.

# डॉ.प्रमोद माने व मुख्य लिपिक एल.आर.कांबळे सेवानिवृत्त सेवा गौरव सोहळ्यात सत्कार



लातूर : येथील दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील डॉ.प्रमोद माने व मुख्य लिपिक एल.आर.कांबळे सेवानिवृत्त झाले आहेत.त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त दि.३१ ऑगस्ट २०२४ रोजी निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी दोघांचाही महाविद्यालयाच्या वतीने सपत्नीक यथोचित सत्कार करण्यात आला.या निरोप समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड होते.याप्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,सेवानिवृत्त सत्कारमूर्ती डॉ.प्रमोद माने,सौ.संगीता माने व मुख्य लिपिक एल.आर. कांबळे,सौ.कांबळे, पर्यवेक्षक डॉ.वैशाली पाटील, पर्यवेक्षक डॉ.संध्या कोल्हे-वाडीकर,

पीआरओ प्रा.बळवंत सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड असे म्हणाले की,दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील डॉ.प्रमोद माने हे अनुभवी,तज्ज्ञ,अभ्यासू आणि कर्तव्यनिष्ठ,विद्यार्थीप्रिय,अध्यापन कौशल्य असलेले हाडाचे शिक्षक आहेत.तसेच एल.आर. कांबळे हेही शिस्तप्रिय कर्मचारी आहेत.त्यांच्या सेवानिवृत्तीमुळे निश्र्चितच पोकळी निर्माण होणार आहे.त्यांची प्रदीर्घ सेवा ही निश्र्चितच आठवणीत राहणारी आहे,असे त्यांनी सांगितले.तर प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी दयानंद शिक्षण संस्थेत व दयानंद परिवारात नोकरी करण्याचे भाग्य डॉ.प्रमोद माने व कांबळे यांना लाभले.कारण एका नामांकित संस्थेत त्यांनी नोकरी केलेली असल्यामुळे समाजाचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन निश्र्चितच चांगला असेल,असे ते म्हणाले.

यावेळी सेवानिवृत्त सत्कारमूर्ती डॉ.प्रमोद माने व कांबळे यांनीही आपल्या भावपूर्ण मनोगतातून संस्था,महाविद्यालय,सहकारी प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांप्रती असलेल्या भावस्पर्शी भावना सांगितल्या.याचबरोबर उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव यांनीही आपल्या मनोगतातून सेवानिवृत्त होत असलेले दोघेही मनमिळाऊ, मितभाषी,सहकार्यशील, कर्तव्यनिष्ठ होते, असे त्यांचे कौतुक केले. सूत्रसंचालन पीआरओ प्रा.बळवंत सूर्यवंशी यांनी केले तर आभार प्रा.डी. व्ही.कुलकर्णी यांनी मानले.याप्रसंगी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी, नातेवाईक,गुरूजण आणि मित्रपरिवार बहुसंख्येने उपस्थित होते.

# २०४७ साली भारत विकसित देशाच्या यादीत दिसेल : डॉ. सूर्या प्रकाश

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे शानदार उद्घाटन

लातूर : प्रत्येक क्षेत्रात आपला देश झपाट्याने पुढे जात आहे. सर्व क्षेत्राचा विकास होतो आहे. सध्या आपण विकसनशील देशाच्या यादीत गणले जातोय. मात्र, २०४७ साली भारत नक्कीच विकसित देशांच्या यादीत दिसेल, त्या दिशेने आपली वाटचाल सुरू आहे, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील नवी दिल्लीच्या श्रीराम महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सूर्या प्रकाश यांनी शनिवारी येथे बोलताना केले.



येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयात इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संयुक्त विद्यमाने येत्या शनिवारी, ३१ ऑगस्ट रोजी लिव्हरेजिंग इंडियाज डेमोग्राफिक डिव्हिडंट फॉर अ सेल्फ रिलायन्स अँड सस्टेनेबल फ्युचर बाय २०४७ या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राचे उद्घाटन प्रा.डॉ. सूर्या प्रकाश यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. चर्चासत्राच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सिध्देश्वर बेल्लाळे, दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. पूनम नाथानी, तर मंचावर उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बालाजी कळंबे आदींची उपस्थिती होती. या चर्चासत्राचे संयोजक डॉ.बालाजी कळंबे यांनी प्रास्ताविक करून चर्चासत्र आयोजना मागील भूमिका विशद केली. पाहुण्यांचा परिचय प्रा.नुरजहाँ सय्यद यांनी करून दिला. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. आकांक्षा भांजी, प्रा.स्वप्नाली शरणार्थी यांनी तर आभार डॉ. ब्रिजमोहन दायमा यांनी मानले.

यावेळी बोलताना डॉ. सूर्या प्रकाश म्हणाले, भारताचा विकास दर विकसित देशाच्या बरोबरीला हळू हळू पुढे जातो आहे. सद्य परिस्थितीत देशाचा झपाट्याने विकास होतो आहे. सध्याचा विकास दर ज्या पद्धतीने आहे तो तसाच राहिला तर २०४७ मध्ये भारत जगाची महासत्ता बनू शकते. अध्यक्षीय भाषणात प्रोफेसर डॉ. प्रशांत मान्नीकर म्हणाले, गेल्या काही वर्षांत आपल्या देशात नवनवीन संशोधन होत आहेत. यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होत आहे.

दुपारच्या सत्रात सहभागी प्राध्यापकांनी पेपरचे सादरीकरण केले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रा.डॉ. शिवप्रसाद डोंगरे होते. तर मंचावर प्रा.डॉ. पुष्पलता कावळे, प्रा.डॉ. प्रकाश रोडिया, प्रा.डॉ. नरेश पिनमकर आदींची उपस्थिती होती. या सत्राचे सूत्रसंचलन प्रा.श्रावण बनसोडे आणि प्रा. कावळे यांनी केले. शेवटी आभार प्रा. कृष्णाई पाचंगे यांनी मानले. या चर्चासत्रात देशभरातून मोठ्या संख्येने प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते. या चर्चासत्राला कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, उपाध्यक्ष ललितभाई शाह, उपाध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा आदींनी शुभेच्छा दिल्या.



सर्वांचे स्नेही व जिवलग मित्र लातूर जिल्हा नोंदणी व मुद्रांक जिल्हाधिकारी श्रीमान संजय जी देशमुख हे सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा पानगावकर मित्र मंडळाच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला तसेच त्यांना पुढील आयुष्य सुखमय,अनंदिदायक जावो या शुभेच्छा देण्यात आल्या. (सौजन्य: बसवेश्वर हालकुडे )

# महात्मा बसवेश्वरमध्ये पदव्युत्तर बहिस्थ अभ्यास केंद्रातील अभ्यासक्रम प्रवेश सुरू

**लातूर / प्रतिनिधी-** येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात नुकतीच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्यावतीने बहिस्थ शिक्षण अभ्यास केंद्राला मान्यता मिळाली आहे. त्यानुसार विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशाला प्रारंभ झाला आहे अशी माहिती महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य तथा अभ्यास केंद्राचे अध्यक्ष डॉ. संजय गवई यांनी दिली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून एम. कॉम व एम. ए. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि अर्थशास्त्र या अभ्यासक्रमांना विद्यापीठाने मान्यता दिली आहे, त्यानुसार महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया चालू आहे. शिक्षण प्रवाहापासून वैयक्तिक कारणास्तव दूर झालेल्या सर्व वयोगटाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना, बेरोजगार, गृहिणी आणि व्यावसायिक कारखानदार यांना बहिस्थ अभ्यासक्रमांतर्गत पदव्युत्तर पदवी प्राप्त करता येणार आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार महाविद्यालयातील तज्ञ, अभ्यासू आणि कार्य कुशल प्राध्यापकाकडून महत्त्वपूर्ण मार्गदर्शन आणि संबंधित विषयाचे संदर्भ ग्रंथ व साहित्य मोफत उपलब्ध होणार आहे. या सुवर्णसंधीचा लाभ लातूर जिल्ह्यातील व जिल्हा बाह्य विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य तथा अभ्यास केंद्राचे अध्यक्ष डॉ. संजय गवई, समन्वयक तथा वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. विजयकुमार सोनी, मराठी विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा रमेश तडवी, हिन्दी विभाग प्रमुख डॉ. मनोहर चपळे. डॉ. धोंडीबा भुरे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आनंद शेवाळे आणि कार्यालयीन कर्मचारी यशपाल ढोरमारे यांनी केले आहे

### आत्मबोध ७

प्रथम विषासम भासते ।
प्राप्त करण्या कष्ट वाटते ।
प्राप्तीने अमृतासम असते ।
सात्विक सुख ।। १ ।।

प्रथम अमृतासम भासते ।
परिणामी हानी होते ।
विषयांपासून मिळते ।
राजस सुख ।। २ ।।

प्रथम मूढ बनवते ।
परिणामी मूढ असते ।
निद्रा, आळसातून मिळते ।
तामस सुख ।। ३ ।।

सुखाचे तीन भेद ।ढ
दुःखा देवू छेद ।
होती साऱ्यांचे खेद ।
दूर आता ।। ४ ।।
- सिद्धदास, सोलापूर
२२/०१/२०२२

पान १ वरून

### केंद्र सरकारचा...

पाणीसाठ माहिती, पीक विमा या बाबींवर काम केलं जाईल. शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळवून देण्याबाबत, खरेदीदार उपलब्ध करुन देण्याबाबतच्या सुविधा याबाबत उपलब्ध केल्या जातील. अन्न व पोषणघटकांच्या सुरक्षेसाठी कृषी विज्ञान याद्वारे संशोधन आणि शिक्षण, कडधान्य आणि तेलबियांच्या विकासासाठी प्रयत्न करणे, गवतवर्गीय पिकांचा विकास, नगदी पिकांचा विकास करणे. या योजनेद्वारे शेतकऱ्यांना २०४७ पर्यंत वातावरणीय बदलांना सामोरं जाण्यासाठी तयार करणे आणि अन्न सुरक्षा पुरवणे. कृषी क्षेत्रातील विद्यार्थी आणि संशोधकांना शेती आणि शेतकऱ्यांसमोर सध्याच्या आव्हांनावर काम करण्यासाठी २२९१ कोटी रुपयांची योजना सुरु करण्यात आली आहे. याद्वारे नव्या शिक्षण धोरणानुसार कृषी शिक्षण आणि संशोधनाचं आधुनिकीकरण, नव तंत्रज्ञानाचा वापर, डीपीआय,एआय, बिग डाटा, नैसर्गिक शेती याला भारतीय कृषी संशोधन परिषदेद्वारे प्रोत्साहन देणे. फळबाग शेतीच्या शाश्वत विकासासाठी ८६० कोटी रुपयांच्या योजनेला मंजुरी देण्यात आली आहे.

### रिफ्लेक्ट ऑर्बिटल....

हा प्रयोग केला आहे. १९९२ मध्ये रशियाने झानाम्या-२ मोहीम सुरू केली होती. त्यासाठी रशियाने अंतराळात एक आरसा बसवला होता. त्या माध्यमातून काही वेळ पृथ्वीच्या दिशेने सूर्यप्रकाश आला होता. तथापि, या यशाची पुनरावृत्ती करण्यात शास्त्रज्ञांना यश आले नाही. कारण त्या वेळी उपग्रह अवकाशात पाठवणे खूप महाग होते.

### भाजपामध्ये...

भाजपा नेते प्रवीण दरेकर म्हणाले की, खडसेंच्या प्रवेशासंदर्भातला निर्णय झालेला नाही. पण, जळगावातील कार्यकर्ते, पदाधिकारी, नेते यांचा त्यांच्या प्रवेशावर आक्षेप आहे. भारतीय जनता पार्टी ही काही ये जा करणा-यांचा पक्ष नाही. त्यामुळे तुमच्या सोयीनुसार तुम्ही लक्षात येणार आणि तुमच्या सोयीनुसार तुम्ही राष्ट्रवादीत जाणार हे अभिप्रेत नाही. पंतप्रधान जळगावला आले होते त्यावेळेस खडसेंना अपेक्षा असेल की, आम्हाला बोलावतील, मात्र हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. उत्तर महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाचे संघटन मजबूत आहे. त्यामुळे या गोष्टींचा विचार करून पक्ष निर्णय घेत असतो. खडसेंनी काय निर्णय घ्यायचा तो त्यांचा विषय आहे. परंतु राजकीय गोंधळलेल्या अवस्थेत खडसे दिसत आहेत, अशी प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली

### लातूर जिल्ह्यात...

६८.०(८२५.०) मि.मी., निलंगा -५४.४ (६१७.५) मि.मी, उदगीर- ९७.० (६७०.४) मि.मी, चाकूर-७५.६ (७२१.७) मि.मी, रेणापूर-८३.७ (७५७.१) मि.मी, देवणी- ९८.१(६०१.९) मि.मी, शिरुर अनंतपाळ- ७१.९ (५४९.०) मि.मी, जळकोट-६२.५ (७३१.८) मि.मी पाऊस झाला आहे. याप्रमाणे जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी १२५ मि.मी. पावसाची नोंद झाली असल्याचे जिल्हा प्रशासनाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

### जिल्ह्यात...

श्री. महाजन यांनी यावेळी दिल्या.

लातूर जिल्ह्यात १ सप्टेंबर रोजी अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाली असून नदी-नाल्यांच्या पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने काही ठिकाणी पुर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

### राजकीय...

आहे. आपल्या समाजात जातीच्या प्रतिक्रियांचा मुद्दा अत्यंत संवेदनशील असून, तो राष्ट्रीय एकात्मतेसाठी महत्त्वाचाही आहे. परंतु जात जनगणनेचा उपयोग निवडणूक प्रचारासाठी न करता दलित समाजाची संख्या जाणून घेण्यासाठी करण्यात यावा, असेही त्यांनी म्हटले आहे.

काँग्रेसने दिले प्रत्युत्तर दरम्यान, सुनील आंबेकर यांच्या या विधानावर काँग्रेस पक्षाने प्रतिक्रीया दिली आहे. आरएसएसने जात जनगणनेला उघड विरोध केला आहे. जात जनगणना समाजासाठी चांगली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. या विधानावरून स्पष्ट होते की, भाजप आणि आरएसएसला जात जनगणना करायची नाही. ते दलित, मागासवर्गीय आणि आदिवासींना त्यांचे हक्क द्यायचे नाहीत, मात्र काँग्रेस जात जनगणना करेल असा दावा काँग्रेस नेत्यांनी केला आहे.

### मांजरा परिवार...

पाटील, मारुती पांडे, लक्ष्मण मोरे, ज्योतीताई पवार, जितेंद्र स्वामी, सचिन दाताळ, राजकुमार पाटील, प्रताप पाटील, कैलास पाटील, विदया पाटील, स्वयंप्रभा पाटील उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना दिलीपरावजी देशमुख म्हणाले की, डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजिस्ट या संस्थेकडून माझा झालेला सन्मान हा प्रातिनिधीक स्वरूपाचा होता, या सन्मानासाठी मांजरा परिवारातील प्रत्येक घटक तेवढाच हक्कदार आहे त्यामुळे मी सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आहे, मांजरा परिवाराची सुरुवात, ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तन घडवण्याच्या उद्देशाने मांजरात कारखान्याची स्थापना करून झाली आहे, माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासरावजी देशमुख साहेब यांचे ग्रामीण विकासाच्या स्वप्न साकार करण्यासाठी आज मांजरा परिवारातील प्रत्येक संस्था आणि त्या संस्थेची निगडित असलेला प्रत्येक माणूस प्रयत्नशील आहे, या कार्यातील सर्वांचे योगदानच एकूण यशा मागचे गमक आहे असे मी मानतो आहे. आधी केले मग सांगितले या युक्तीप्रमाणे मांजरा परिवारात चांगले निर्णय घेतले जातात, त्यावर अंमलबजावणी केले जाते आणि मग इतर समोर त्याचे परिणाम ठेवले जातात, यातून मराठवाड्यातच नव्हे तर राज्यात आणि देशात मांजरा परिवाराचा आदर्श अनुकरणीय पॅटर्न तयार झाला आहे. आता हा परिवार जिल्हा पुरता मर्यादित राहिला नसून मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक कारखाना आदर्श पद्धतीने चालवून इतरांना त्या त्या पद्धतीचे कार्य करण्याची प्रेरणा देत असल्याचेही त्यांनी म्हंटले.

मराठवाड्यातील महाविकास आघाडीच्या कामगिरीने महायुतीची झोप उडाली :आ अमित देशमुख

लोकसभा निवडणुकीत मराठवाड्यात महाविकास आघाडीला मिळालेल्या उत्तुंग यशामुळे विद्यमान महायुती सरकारची झोप उडाली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीतही आपली एकजूट कायम राहिल्यास मराठवाड्यात आणि पर्यायाने महाराष्ट्राच्या विधानसभेवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी या सर्वसाधारण सभेत बोलताना व्यक्त केला.

या सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेले सर्व शेतकरी सभासद, आणि लातूर, धाराशिव जिल्ह्यातून आलेले पदाधिकारी कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधला. आमदार अमित देशमुख यावेळी म्हणाले की, केंद्र शासनापेक्षा महाराष्ट्रातील महायुती सरकारवर जनतेचा अधिक रोष आहे, त्यामुळेच राज्यात महाविकास आघाडीला उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहेत. काँग्रेस आणि मित्र पक्षाकडे उमेदवारी मागणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढली आहे, यावरून राज्यात परिवर्तन अटळ आहे हे दिसून येत आहे. जागा मर्यादित आणि इच्छुक अधिक असले तरी ज्यांना उमेदवारी मिळेल त्यांना विजय करण्यासाठी सर्वांनी आपला एकोपा कायम ठेवायचा आहे.

सुरक्षित बहीण योजना कधी आणणार यावेळी पूढे बोलतांना यावेळी माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले, महाविकास आघाडीला मिळत असलेल्या प्रतिसादामुळे महायुतीची झोप उडाली असून लाडक्या बहिणी सारख्या योजना जाहीर केल्या जात आहेत, लाडक्या बहिन योजनेला आमचा विरोध नाही परंतु सुरक्षित बहिण योजना कधी आणणार हा आमचा सरकारला प्रश्न आहे.

कंत्राट वाटण्यात आणि कमिशन गोळा

करण्यात सरकारचे प्रतिनिधी व्यस्त राज्यात सत्ताधारी असलेल्या महायुतीच्या तिघाडी सरकारमध्ये एक वाक्यता नाही, कंत्राट वाटण्यात आणि कमिशन गोळा करण्यात या सरकारचे प्रतिनिधी धुंद आहेत हे सर्व चित्र महाराष्ट्रातील जनता उघड्या डोळ्यांनी पहात आहे असे यावेळी आमदार अमित देशमुख म्हणाले.

**महायुती सरकारला माफी नाही**

वाऱ्याने पुतळा पडू शकतो असे आजवर जगभरातले एकही उदाहरण नाही त्यामुळे मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्यामागे महायुती सरकारचा भ्रष्ट कारभार आणि निष्काळजीपणा कारणीभूत आहे हे स्पष्ट आहे, या परिस्थितीत सरकारला जनता कदापिही माफ करणार नाही हे उघड आहे असे यावेळी बोलतांना माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले.,

बदलत्या तंत्रज्ञानामुळे ऊस शेतीला मोठे भवितव्य तंत्रज्ञानात होत असलेल्या संशोधनामुळे उसापासून उपपदार्थ निर्मिती आणि त्याच्या वापरात क्रांतिकारी बदल घडून येत आहेत, या परिस्थितीत ऊस शेतीला मोठे भवितव्य असून हे ऊसउत्पादन वाढवण्यासाठी मराठवाड्यात मोठा वाव असल्याचेही आमदार अमित देशमुख यांनी यावेळी बोलताना सांगितले.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# जिल्ह्यात बैल पोळा उत्साहात साजरा



**लातूर / प्रतिनिधी-** बैलांचा सण पोळा जिल्ह्यात सर्वत्र मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला. यानिमित्त बळीराजाच्या कृषी कन्येने वृषभ देवाचे औक्षण करीत मनोभावे पूजन करून त्यांना पुरणपोळीचा नैवद्य अर्पण केला. सर्वांनी बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करीत भक्तीने एका शक्तीचे पूजन केले. मात्र दिवसेंदिवस बैलांची संख्या कमी होत असल्याचे चित्र पहावयास मिळाले.

निलंगा तालुक्यातील कासार शिरसीसह परिसरात शेतकऱ्यांच्या कष्टात सर्व शक्तीनिशी त्यांना साथ देणाऱ्या बैलांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करणारा बैल पोळा उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त सजवलेल्या बैलांच्या मिरवणुका काढण्यात आल्या. त्यांचे औक्षण करून सुवासिनींकडून ओवाळण्यात आले तर पुरण पोळीचा नैवद्य दाखवत कृषी कन्येने त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

सध्या कृषी क्षेत्रात यांत्रिकीकरण पध्दत अवलंबण्यात येत असली तरी भारत या कृषीप्रधान देशात अद्याप भूतदयेचा अभाव झाला नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे बैल पोळा होय. बळीराजांनी ज्याच्यावर जिवापाड प्रेम केले, अशा बैलांचा उत्सव जिल्हाभरात मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त पावसाने उसंत दिल्याने निलंगा तालुक्यातील कासार शिरसी शहरात बैलांच्या मिरवणुका काढण्यात आल्या. यानिमित्त तेथील वेशीत सरपंच माली पाटील - पटवारी व कुलकर्णी यांच्या मानाच्या शेतकऱ्यांच्या हस्ते तोरण तोडून बाहेरगावाहून आलेल्या बँड पथक, हलगींच्या निनादात मिरवणुका काढण्यात आल्या. पावसाने उसंत दिल्याने मिरवणुका उशिरापर्यंत काढण्यात आल्या. मिरवणुका पाहण्यासाठी ठिकठिकाणी नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

एकंदरीत, जिल्हाभरात बळीराजाला वर्षभर साथ देणाऱ्या सर्जा-राजाचा सण बैल पोळा मोठ्या उत्साहात आणि शांततेच्या वातावरणात साजरा करण्यात आला. यासाठी सर्वत्र पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



येरोळ ता.शिरुरआनंतपाळ येथील सुपुत्र डॉ.जगदिश येरोळकर व डॉ.गिरीष येरोळकर हे आपल्या जन्मगावी आल्याबदल जेष्ट पत्रकार ओमप्रकाश तांबोळकर यांनी त्यांचा शालश्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी बाबुराव वाघमारे हे उपस्थित होते.

# मारोती मंदिराला प्रदक्षिणा घालून बैलपोळा सण साजरा वाजत-गाजत ..

**प्रशांत तांबोळकर**

शिरूर आनंतपाळ / प्रतिनिधी: शेतकऱ्यांना शेती कामासाठी वर्षभर साथ देणाऱ्या लाडक्या सर्जा-राजा अर्थात बैलजोडीचा पोळा हा सण शिरूरआनंतपाळ तालुक्यात सोमवारी मोठ्या उत्साहात वाजत गाजत गावातील मारोती मंदिराला प्रदक्षिणा घालुन साजरा करण्यात आला. ज्यांच्याकडे बैल आहेत अशा शेतकर्यांनी पुरोहिता मार्फत पुजन करुन बैलांना पुरणपोळीचा नैवद्य खाऊ घालुन ठिकठिकाणी शेतकऱ्यांनी बैल जोडीचे पुजन केले. येरोळ व परिसरातील सुमठाणा, चामरगा, बोळेगाव, धामणगाव, कारेवाडी आदी गावातील शेतकऱ्यांनी पोळ्याचा सण उत्साहात साजरा केला. बैल जोडीस रंगरंगोटीसह, फुगे, झुल, गळ्यात घुंगर माळा बांधून आकर्षक सजावट करण्यात आली होती. येरोळ येथील मानकरी सोमेश्रवर पाटील मुकदम यांच्या हस्ते मारोती मंदिराजवळीळ वेशीचे तोरण तोडुण बैलांचे पूजन करून पुरण पोळीचा नैवेद्य खाऊ घालण्यात आला. यावेळी बैल जोडीची वाजत गाजत गावातून मिरवणूक काढण्यात आली.



## दादासाहेब फाळके चित्रपट संघटनेच्या अध्यक्षपदी संतोष आमले



पनवेल / प्रतिनिधी - मुंबई विभागीय दादासाहेब फाळके चित्रपट संघटनेच्या पनवेल अध्यक्षपदी येथील दैनिक युवक आधारचे संपादक संतोष शिवदास आमले यांची निवड झाली आहे. संघाचे ध्येय धोरणे व कार्यक्रम राबविताना समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देउन संघटनेच्या मजबूतीसाठी प्रयत्न करावेत या उद्देशाने त्यांची निवड करण्यात आली. संघटनेचे अखिल भारतीय अध्यक्ष अजीत म्हामूनकर यांनी तसे नियुक्तीपत्र दिले आहे. चित्रपट क्षेत्रात तरुण पीढीचे सकारात्मक विचार रुजावेत तसेच समाजप्रबोधनपर चित्रपट निर्माण व्हावेत या उद्देशाने संघटनवाढीसाठी प्रयत्नशील राहील अशी प्रतिक्रिया संतोष आमले यांनी दिली.

त्यांच्या नियुक्तीबद्दल पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे अभिनंदन करण्यात आले आहे.

## नताशापासून वेगळे झाल्यानंतर कोणासोबत फिरतोय हार्दिक पांड्या?



मुंबई: भारतीय क्रिकेट संघाचा ऑलराऊंडर क्रिकेट हार्दिक पांड्या सध्या सुट्टीवर आहे. तो अखेरच्या वेळेस श्रीलंकेविरुद्ध टी-२० मालिकेत खेळला होता. त्याने वनडे मालिकेतून आपले नाव मागे घेतले होते. पांड्या पत्नी नताशा स्टेनकोविकपासून वेगळे झाल्यानंतर तुटला होता. दरम्यान तो स्वत:ला सांभाळण्याचा प्रयत्न करत आहे. सध्या तो विदेशात फिरत आहे. मात्र तो कोणासोबत आहे हे सांगितले जाऊ शकते.पांड्याने इन्स्टाग्रामवर दोन फोटो शेअर केले आहेत. यात तो ट्रेनमध्ये बसलेला दिसत आहे. पांड्या फिरण्यासाठी निघाला आहे. मात्र तो कोणासोबत फिरत आहे याची माहिती मिळालेली नाही. पांड्याचे फोटो कोणीतरी दुसऱ्या व्यक्तीने क्लिक केले आहेत. अशी अफवा होती की पांड्या सध्या जास्मिनला डेट करत आहे. मात्र याबाबतची अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

हार्दिक आणि नताशा का वेगळे झालेत. टाइम्स नाऊच्या माहितीनुसार पांड्याला अतिशय चकचकी त आयुष्य पसंत होते. दरम्यान, नताशाला शांत आणि सरळ आयुष्य जगायला आवडत होते. नताशाने पांड्यासोबत राहण्याचा खूप प्रयत्न केला. मात्र तिला या वातावरणात ॲडजस्ट करायला जमले नाही.

## मैदानात उतरण्यासाठी शमी उत्सुक, पुनरागमनाबाबत आले मोठे अपडेट



मुंबई: भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी दुखापती आणि सर्जरीमुळे गेल्या ९ महिन्यांपासून क्रिकेटच्या मैदानापासून दूर आहे. मात्र आता तो फिट झाला आहे.शमीने वनडे वर्ल्डकप २०२४ फायनलनंतर सामना खेळलेला नाही. यानंतर तो टाचेच्या दुखापतीमुळे बाहेर गेला होता. त्याची सर्जरीही झाली. शमी दुखापतीमुळे आयपीएल आणि टी-२० वर्ल्डकपही खेळू शकला नाही. तो एनसीएमध्ये रिहॅबमध्ये आहे आणि नेट्समध्ये गोलंदाजी सुरू केली आहे. तो डोमेस्टिक क्रिकेटमधून पुनरागमन करेल. शमी रणजी ट्रॉफीमध्ये खेळू शकोत. शमी आणि त्याचा छोटा भाऊ मोहम्मद कैफला बंगाल स्कॉडच्या संभाव्य ३१ प्लेयर्सच्या लिस्टमध्ये सामील केले गेले.पीटीआयच्या माहितीनुसार शमी बंगालचे पहिले दोन सामने खेळू शकतो. हे सामने ११ ऑक्टोबरपासून उत्तर प्रदेश आणि १८ ऑक्टोबरपासून बिहारविरूद्ध होणार आहेत.

सप्टेंबरपासून बांगलादेशविरुद्ध कसोटी मालिका सुरू होत आहे. यात शमी खेळणे अशक्य दिसत आहे. मात्र ऑक्टोबरपासून न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत तो खेळू शकतो.

## भारताच्या खात्यात दुसरे सुवर्णपदक, आतापर्यंत९ पदकांची कमाई

मुंबई: नितेश कुमारने पॅराऑलिम्पिक २०२४मध्ये सुवर्णपदक जिंकले आहे. त्याने बॅडमिंटनच्या पुरुष एकेरी एसएल३ कॅटेगरीमध्ये ग्रेट ब्रिटनच्या डेनियल बॅथेलला २१-१४, १८-२१, २३-२१ असे हरवत सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. पॅरिस पॅराऑलिम्पिकमध्ये भारताचे हे दुसरे सुवर्णपदक आहे. आतापर्यंत भारताने एकूण ९ पदकांची कमाई केली आहे. नितेशने पहिल्यांदाच या स्पर्धेत भाग घेतला होता आणि त्याने



पहिल्याच प्रयत्नात सुवर्णपदक मिळवत इतिहास रचला. तो आता पॅराऑलिम्पिकच्या बॅडमिंटन स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा केवळ तिसरा भारतीय खेळाडू ठरला आहे. त्याच्या आधी टोकियो पॅराऑलिम्पिकमध्ये प्रमोद भगत आणि कृष्णा नागर यांनी पुरुषांच्या एकेरी स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते.

भारताच्या खात्यात ९वे पदक

भारताने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आतापर्यंत ९वे पदक मिळवले आहे. सध्या सुरू असलेल्या स्पर्धेत नितेश कुमार बॅडमिंटनमध्ये पदक जिंकणारा पहिला खेळाडू ठरला आहे. नेमबाजीत आतापर्यंत ४ पदके मिळाली आहेत. ॲथलेटिक्समध्येही भारताला ४ पदके मिळाली आहेत.

## दुरूस्तीकरिता शहराच्या पुर्व भागातील काही परिसराचा वीजपुरवठा आज बंद राहील

लातूर, दि.२ सप्टेंबर : वीजयंत्रणेच्या तातडीच्या दुरूस्ती व देखभाली करिता १३२ केव्ही. कोयना अतिउच्च दाब उपकेंद्र तसेच ११ केव्ही सिंहगड व ११ केव्ही बाभळगाव, ओसा व सुतमिल, टाऊन, सिध्देश्र्वर वीजवाहिनीवरील लातूर शहर शाखा क्रमांक ०४ क्रमांक ०५ आणि ०८ अंतर्गत येणाऱ्या परिसराचा वीज पुरवठा आज मंगळवार ( दि.३ सप्टेंबर) रोजी सकाळी ०९ ते दुपारी ०२ तसेच काही भागाचा दुपारी १:३० ते ५:३० वाजे दरम्यान वीज पुरवठा बंद राहील. संबंधीत वीजग्राहकांनी नोंद घेवून सहकार्य करावे असे आवाहन महावितरणने केले आहे.

११ केव्ही सिंहगड वीजवाहिनीवरील लातूर शहर शाखा क्रमांक ०४ अंतर्गत येणाऱ्या कण्हेरी, पटेल नगर, माताजी नगर पोस्टल कॉलनी, आयोध्या नगर गोकुळधाम, खंदाडे नगर, खुब्बा नगर सर्वानंद नगर, हाज्जू नगर, विश्र्वराज सिटी, संभाजीनगर, शंकरपुरं नगर, कन्हैया नगरी, उज्वल धाम, नरेंद्र धाम विश्र्वसागर सिटी या परिसराचा वीजपुरवठा दुपारी १:३० ते सायंकाळी ५:३० या दरम्यान वीज पुरवठा बंद राहील.

११ के.व्ही बाभळगाव वीजवाहिनीवरील शहर शाखा क्रमांक ०४ अंतर्गत येणाऱ्या बस्तापुरे नगर, इस्लामपुरा शास्त्री नगर, इंदिरा नगर अंजलीनगर, तुळजा भवानी नगर, जयभीम नगर, लकड़ी मार्केट, बालाजी नगर, सारोळा रोड, शिक्षक कॉलनी या भागाचा वीजपुरवठा दुपारी १:३० ते सायंकाळी ५:३० या दरम्यान व ११ केव्ही टाऊन फिडरवरील कोळे नगर, लेबरकॉलनी, आनंद नगर, शाहूनगर, विवेकानंद चौक, वंदना टॉकीज, गरुडचौक, करीम नगर, रहीम नगर, संत गोरोबा सोसायटी तसेच ११ केव्ही सिध्देश्र्वर फिडरवरील बादाडे नगर, तावरजा कॉलनी, बाभळगाव चौक, माढा कॉलनी, रुद्राक्ष नगर, आरटीओ ऑफिस, अविष्कार कॉलनी, पाचपीर नगर इत्यादी भागातील वीज पुरवठा सकाळी ०९ ते दुपारी ०१ या दरम्यान बंद राहील.लातूर शहर शाखा क्रमांक ०५ अंतर्गत येणाऱ्या ११ केव्ही ओसा व ११ सुतमिल वीजवाहिनीवरील आदर्श कॉलनी, नारायण नगर, राम नगर, नंदी स्टॉप, एलआयसी कॉलनी, बोबे नगर, सुतमिल एरिया, ट्यूशन एरिया, उद्योग भवन, शिवाजी चौक, मंत्री नगर, राजीव गांधी नगर, देसाई नगर, शनी मंदिर, खोपेगाव रोड, पॉलटेक्नीक कॉलेज, कापड मिल, अंबिका नगर इत्यादी भागातील वीजपुरवठा सकाळी ०९ ते दुपारी ५:३० या दरम्यान बंद राहील,सर्व वीज ग्राहकांनी याची नोंद घ्यावी ही विनंती. काम करत असताना जोराचा पाऊस आल्यास दुरूस्तीचे काम करता येणे शक्य नसल्याने काम बंद करून वीजपुरवठा पुर्ववत करण्यात येईल.

### जाहीर प्रगटन

माझे पक्षकार फैसल दावल तांबोळी रा. खोरी गल्ली, लातूर यांनी दिलेल्या माहितीवरुन, दाखविलेल्या कागदपत्रावरुन व मला अधिकृत केलेवरुन लातूर जिल्ह्यातील तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, मौ. महाराणाप्रताप नगर जि. लातूर येथील जमीन सर्वे नं.७० पैकीचा याचा प्लॉट नं. १० विक्री करत असून याचे विक्री क्षेत्र रुंदी दक्षिण उत्तर ९ मिटर व लांबी पूर्व पश्चिम १५ मिटर याचे एकूण क्षेत्रफळ १४५२ चौ. फुट ज्याचा खरेदीखत दस्त डेबुक नं.३५५४/२००५, दि.१२/०५/२००५ ईसवी अन्वये याची चतु:सिमा खालीलप्रमाणे पुर्वेस-भातांगळीकर यांची प्लॉटींगी पश्चिमेस- ६ मिटर रुंदीचा रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नं.११, उत्तरेस-प्लॉट नं.९

येणेप्रमाणे वरील नमुद चतु:सिमेच्या आतील सदर प्लॉटचे विद्यमान मालक राजकुमार वैजनाथ देवसटवार यांच्याकडुन सदरील प्लॉटचे ठरावपत्र करुन घेतलेले असून ते भानुदास ज्ञानोबा कांबळे रा.गवळी नगर, लातूर ता.जि. लातूर यांनी सदरील प्लॉटचे ठरावपत्र करुन घेतलेले असून सदर प्लॉट विक्रीचा ठराव करुन दिला आहे व त्यांनी सदर प्लॉट माझे पक्षकारास कायमस्वरुपी विक्रीचा ठराव करुन ठरावापोटी काही रक्कम स्विकारलेली आहे व सदर प्लॉटचे खरेदीखत मुळ मालकाकडुन माझे पक्षकाराच्या हक्कात करुन देण्याची हमी माझ्या पक्षकारास दिलेली आहे. तरी वरील वर्णनिय प्लॉट बाबत जर कोणाचा काही हक्कसंबंध, हितसंबंध, सरकारी अथवा निमसरकारी कर्ज, बोजा, लिज, कोर्ट प्रकरण, डिक्री, गहाण, तारण, वारसा, बक्षिस, करार इत्यादी किंवा कसल्याही प्रकरचे हक्कसंबंध असतील तर सदरील जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन सात (०७) दिवसाचे आत माझ्याकडे किंवा माझ्या पक्षकाराकडे खालील दिलेल्या पत्त्यावर लेखी आक्षेप नोंदवावेत, मुदतीत आक्षेप नाही आल्यास सदरचा प्लॉट हा निर्विवाद, निर्जोखमी समजण्यात येईल व माझे पक्षकार खरेदीखत त्यांच्या हक्कात करुन घेतली व मुदतीनंतर आलेले कसल्याही प्रकारचे आक्षेप/उजर माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.
दिनांक:०२/०९/२०२४
तर्फे

**ॲड. पी.व्ही. कलुरे**
**नोटरी गव्र्ह. ऑफ इंडिया**
**लातूर, जि. लातूर**
**मोबा-७०५८६२०५८३**

**जाहीर प्रगटन देणार**
**फैसल दावल तांबोळी**
**रा. खोरी गल्ली, लातूर**
**मोबा-९१७२०१७१८१**

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना घरगुती दराने वीजपुरवठा

मंडळांनी अधिकृत वीजजोडणी घ्यावी- महावितरणचे आवाहन.अर्ज करताच चोवीस तासात मीळणार वीज जोडणी

लातूर, दि. ०२ सप्टेंबर : सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांना वीजजोडणीचा अर्ज करताच चोवीस तासाच्या आत वीजजोडणी दिली जाणार असून मंडळांच्या मागणीनुसार महावितरणकडून तात्पुरती वीजजोडणी देण्यात येत आहे. या तात्पुरत्या जोडणीच्या वीजवापरासाठी घरगुती वीजदर आकारण्यात येणार आहेत. त्यामुळे सार्वजनिक गणेश मंडळांनी अधिकृत वीजजोडणी घेवून, वीजसुरक्षेबाबत गांभिर्याने उपाययोजना करूनच विघ्नहर्त्याचा उत्सव आनंदात साजरा करावा असे आवाहन महावितरणने केले आहे.गणेशोत्सवाच्या कालावधीत पावसाची शक्यता असल्याने गणेश मंडळांनी संभाव्य धोके टाळण्यासाठी वीजयंत्रणेची योग्य काळजी घ्यावी. मंडपाची व रोषणाईसाठी विद्युत व्यवस्था व संच मांडणी ही अधिकृत विद्युत कंत्राटदारांकडूनच करून घेणे आवश्यक आहे. गणेश उत्सव मंडपातील वीजयंत्रणेचे अर्थिंग सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी. मंडळाच्या अंतर्गत वायरचे इन्सूलेशन खराब झाल्यास अशा वायर्समधून मंडपाच्या लोखंडी पत्र्यांमध्ये किंवा ओल्या वस्तुंमध्ये विद्युत प्रवाह येऊ शकतो. हा प्रकार टाळण्यासाठी वायर्सचे जोड काढून टाकावेत किंवा जोड द्यायचा असल्यास योग्य क्षमतेच्या इन्सूलेशन टेपने जोड देण्यात यावा. स्वीचबोर्डच्या मागे प्लायवूड किंवा लाकडी फळी लावल्याची खात्री करून घ्यावी.गणेशोत्सवात वीजपुरवठा आणि जनरेटरसाठी स्वतंत्र न्यूट्रल घेणे अत्यावश्यक आहे. काही कारणास्तव वीजपुरवठा बंद असताना जनरेटर सुरु केल्यास एकाच न्यूट्रलमुळे जनरेटरमधील वीजप्रवाह लघुदाब वीजवाहिनीमध्ये प्रवाहित होतो व त्यातून जीवघेण्या अपघाताची शक्यता निर्माण होते. संततधार पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे मंडपातील वीजयंत्रणेसह सार्वजनिक ठिकाणी लावलेल्या लाईटिंगचे वायर्स खाली झुकलेले नाही किंवा विस्कळीत झालेले नाहीत याची दैनंदिन तपासणी करावी.

गणेशोत्सवाच्या काळात मंडपात शॉर्टसर्कीट होणे, विद्युत वायरिंगमध्ये बिघाड होणे आदी कारणांमुळे संभाव्य धोके टाळण्यासाठी सर्व गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधीत क्षेत्रातील महावितरणचे अभियंता व कर्मचारी यांचे भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवून ठेवावेत. तसेच तक्रारींसाठी किंवा तातडीच्या मदतीची गरज भासल्यास २४ तास उपलब्ध असलेले १९१२ किंवा १८००२१२३४३५ किंवा १८००२३३३४३५ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस
**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

# ४ सप्टेंबरला बुद्ध विहार उद्घाटन व महिलांचा आनंद मेळावा

## *क्रीडामंत्री संजय बनसोडे; जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्याकडून आढावा*



**उदगीर (प्रतिनिधी)** भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रथम आगमनासाठी ऐतिहासिक उदगीर नगरी सज्ज झाली आहे. चार तारखेला होणाऱ्या बुद्ध विहार उद्घाटन व महिलांच्या आनंद मेळाव्याची तयारी पूर्ण झाली असून उदयगिरी महाविद्यालयाच्या मैदानावर भव्य सभा मंडप उभा राहिला आहे. बुद्ध विहार लोकार्पणासाठी सज्ज असून आज पूर्ण परिस्थितीचा आढावा राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे व जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी घेतला.

राष्ट्रपती महोदयांचा महाराष्ट्राच्या दौऱ्याची आजपासून सुरुवात झाली आहे. बुद्धविहाराचे लोकार्पण व महिलांचा आनंद मेळावा नियोजित वेळेवर व्हावा, यासाठी प्रशासन ताकदीने कामाला लागले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लभार्थी महिलांचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत राज्यातील पहिलाच कार्यक्रम या ठिकाणी होत आहे.

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, त्यांना पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीसाठी चालना देणे, महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर बनवणे, यासाठी विविध शासकीय योजनांची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनांचा दुसरा टप्पा सुरू झाला आहे.

महाराष्ट्रात प्रथमतः या कार्यक्रमाला राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या स्वागतासाठी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामजिक न्याय राज्यमंत्री, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यासह विविध मान्यवर उदगीरमध्ये पोहचत आहेत.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी आज या आयोजनाच्या शेवटच्या टप्प्यात सर्व कार्यक्रम स्थळांची पाहणी केली. राष्ट्रपतींचा हा पहिलाच उद्गित दौरा असून तो स्मरणीय बनावा यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

कार्यक्रमस्थळी विविध शासकीय विभागांच्या योजनांची माहिती देणारी दालने उभारण्यात येणार आहेत. आज या दालनाची ही पाहणी मान्यवरांनी केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, महिला सन्मान योजना यासारख्या विविध योजनांमधील लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात राष्ट्रपतींच्या उपस्थितीत सन्मानित केले जाणार आहे. राष्ट्रपतींचा थेट संदेश ऐकण्याची संधी या कार्यक्रमात मिळणार असल्यामुळे या कार्यक्रमांची महिला जगतात प्रचंड उत्सुकता आहे.

**: तापमान:**
कमाल - २५.० से.
किमान - २०.५ से.
आर्द्रता - ९७.००
पर्जन्य - ७६.०मी.मी
पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर

# जळकोट तालुक्यातील अतिसंवेदनशील अतनूर गावाला जाणाऱ्या रस्त्यावर पूलाचे बांधकाम त्वरित करण्याची मागणी



**जळकोट (प्रतिनिधी)** महाराष्ट्र राज्य, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलगाना राज्याच्या सीमावर्ती सरहद्दीवरील स्थित तथा लातूर व नांदेड जिल्हा सरहद्द सीमावर्ती मार्गावर लातूर जिल्ह्याची ओळख राज्य पातळीवर अतिदुर्गम व डोंगराळ भागात दरीखाऱ्यात वस्ती वसलेले गाव म्हणून अतनूर परिसरातील २८ तांडा-वाडी-तांडा-वस्तीतील अतनूर एकमेव गाव आहे. लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातील अतनूर परिसरातील अतनूर, गव्हाण, मेवापूर, मरसांगवी, रावणकोळा, शिवाजीनगर, रामपूर, भवानीनगर, गुत्ती, सुल्लाळी, डोंगरगाव, अतनूर तांडा, चतुराई तांडा, तिरूका गावे केंद्र शासनाने आधीच दरीखोरयातील डोंगराळ आकांक्षीत आजही जिल्ह्याच्या काही भागातील नागरिक अनेक मूलभूत सोयी सुविधा पासून वंचित आहेत. विविध समस्येने ग्रासलेला गाव म्हणजे जळकोट तालुक्यातील अतनूर गाव या गावात अठरापगड जाती धर्मा तील बंजारा, लमान तांडा-वाडी-तांडा-वस्तीतील दलित, पददलित, बौद्ध, अल्पसंख्याक, मुस्लिम, दलित, हिंदु, वंजारी, बंजारा आदिवासी समाज वसलेला आहे. भारत स्वातंत्र्य झाल्यापासून या भागातील विविध समस्यांनी ग्रस्त असलेल्या सर्वसामान्य नागरिकांपासून, राजकीय नेते, पुढाऱ्यांपर्यंत, लोकप्रतिनिधी, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्याचे विविध मंत्र्यांपर्यंत व सरपंचापासून ते जिल्हा परिषद अध्यक्षांपर्यंत, ग्रामसेवकापासून ते मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत, राज्यांच्या प्रधान सचिवांपर्यंत तसेच या भागाचे लोकनेते, आमदार तथा नामदार व क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्यासमोर गावकऱ्यांनी सदर समस्या मांडले अतनूर गावात येण्या-जाण्याकरिता अतनूर परिसरातील २८ गावातील रहदारीसाठी महत्त्वाचे तेरू नदीवरील या पुलाचे बांधकाम होणे आवश्यक आहे व सदर नादुरुस्त व जुन्या पुलाची पाहणीनुसार केली असता पुलाची अक्षरशः दुर्दशा झालेली आहे. असे आढळून आले.

या पुलावरून मोटरसायकल सुद्धा जाऊ शकत नाही. पावसाळ्याच्या दिवसात अतनूर तेरू नदीवरील पुल नसल्याने ग्रामस्थांना तीन-तीन महिने गावातच अडकून राहावे लागते व सदर पुल नसल्याने ग्रामस्थांना आरोग्य सुविधा मुलांना शैक्षणिक सुविधा, पावसाळ्याच्या दिवसात मिळणे अतिशय कठीण झालेले आहे. परंतु स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षापासून आजपर्यंत सदर पुल बांधकाम मंजूर झालेले नाही.

त्यामुळे राज्य सरकारने सदर पूलाचे बांधकाम तात्काळ मंजूर करून सुरुवात करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेचे जिल्हासरचिटणीस विकास सोमुसे-पाटील, शिवसेना (उबाठा)चे जळकोट तालुकाप्रमुख मुक्तेश्वर पाटील, चिचोंलीच्या सरपंच सौ.रेखा बिरादार, माजी सरपंच संतोष बट्टेवाड, बिरादार, गव्हाणचे सरपंच बालाजी गुडसुरे, बिरादार, गुत्तीच्या सरपंच सौ.मीनाताई यादवराव केंद्रे, ग्रामपंचायत सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नेते यादवराव केंद्रे, मेवापूर च्या सरपंच सौ.कोमल तुळशीदास पाटील, सामाजिक कार्यकर्ते तुळशीदास पाटील, अमोल गायकवाड, बाजीराव कापडे, शिवसेनेचे, शरद पवार राष्ट्रवादीचे, भारतीय कॉंग्रेस पक्षातील पदाधिकारी, सत्तेतील मंडळी व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी केले.

**टि.सी. हरवली आहे**

माझी ऋषिकेश बाळकृष्ण बोराळे या नावाची इ. १० वी पासची टि.सी व मार्कमेमो उमाचौक ते लोहारा बस प्रवासात दि. २०/०८/२०२४ रोजी हरवली आहे.
जर कोणास साडल्यास संपर्क साधावा.
मो.नं ७९७२११३९६५





# श्रीमद भगवतगीता स्पर्धेत सौ. वैशाली कुलकर्णी यांचे यश

**उदगीर (प्रतिनिधी)** श्री क्षेत्र श्रंगेरी (शारदापीठ ) येथे दिनांक १४-०७-२०२४ रोजी झालेल्या श्रीमद भगवदगीता कंठस्थ स्पर्धा परीक्षेत उदगीरच्या सौ. वैशाली दिगंबर कुलकर्णी (बामणीकर) या विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्या असून त्यांना १५ हजार रूपयांचे रोख पारितोषिक मिळाले आहे.

श्रीकृष्णाचा फोटो, श्री गीता ज्ञान फ्रेम, प्रमाणपत्र आणि १५ हजार रूपये रोख असे पारितोषिकाचे स्वरूप होते. जगद्गुरू श्री. श्री. शंकराचार्य विदुशेखर भारती महास्वामी यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. सौ. वैशाली दिगंबर कुलकर्णी यांना यापूर्वीही गीता परिवाराच्या गीतावृत्ती परिक्षेत दिनांक २६-०५-२०२४ रोजी झालेल्या श्रीमद भगवदगीता कंठस्थीकरण स्पर्धेतही सुवर्णपदक मिळालेमुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पुर्वा नक्षत्राने शेतकऱ्यांना जीवदान

**देवणी (प्रतिनिधी)** देवणी तालुक्यातील एकुणच शेतकरी मृग नक्षत्रापासुन मोठ्या पावसाची अपेक्षा ठेऊन होते मात्र पेरणी पुरता मर्यादितच पाऊस झाला व पेरणी करावी लागली काही शेतकऱ्यांनी आर्द्रतात पेरणी केली.

नंतर म्हणावा तसा समाधान कारक पाऊस झाला नाही मघा नक्षत्र थोडे फार कोठे पडले तर कोठे नाही. कीड प्रादुर्भाव झाल्याने शेतकरी अडचणीत आले.आणी औषध दुकानदाराची चांदी झाली.

देवणी तालुक्यातील तलाव अजूनही भरले नाहीत एव्हाना ओसंडून वाहीले नाहीत. शेतकऱ्यांचे भाषेत रानातून पाणी बाहेर आलेच नाही.रानातच पाणी मुरले.
शेतकऱ्याची अर्थ वाहीनी असलेले सोयाबीन पीकासाठी हा पुर्वा नक्षत्राचा पाऊस उत्तम पडला आहे.असाच पाऊस या नक्षत्राचा झाला तर तलाव ओसंडून वाहतील व पिण्याच्या पाण्याची सोय व उसाचे क्षेत्रही वाढण्यास मदत होईल.
या वर्षी सुरुवातीला मोजकाच पाऊस झाल्याने तुरीचे पीक चांगले आहे. शेतकऱ्यांच्या भाषेत तूर उंबळून गेली नाही. त्यामुळे सध्यातरी सोयाबीन व तूर ही पिके जोमदार आहेत.सोयाबीन हे पीक इतके उंच आले आहे की पीकामधे जाऊन तण काढणे अवघड झाले आहे.सध्या सोयाबीन वर आळी खुप प्रमाणात पडली आहे परंतु मध्ये फवारणी करणे हे खूप अवघड झाले आहे मुगाला भाव चांगला असल्याने अर्थ वाहीनी चांगली आहे.उडीद हेही पीक चांगले आहे.
एकुणच पुर्वा नक्षत्राने एंट्री तरी दमदार केली आहे छक्के व चौकार लगावुन शतक केल्यास शेतकऱ्यांना जनावरांना जीवदान मिळणार आहे.सध्या हा सोयाबीन चा पैशाचा पाऊस आहे.

*तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय*
(दंडणीय विभाग )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२०/०८/२०२४

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार शकुंतला देविदास दंडे रा.हेर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९५३ रोजी मौजे हेर ता. उदगीर येथे झाला असून जन्म नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार शकुंतला देविदास दंडे रा.हेर यांनी त्यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९५३ रोजीची नोंद जन्म नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक १९/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९५३ रोजी मौजे हेर ता. उदगीर येथे झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार शकुंतला देविदास दंडे रा.हेर यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९५३ रोजीची नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय हेर ता. उदगीर येथे जन्म नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २०/०८/२०२४ रोजी दिले
पूढे नेमलेली तारीख २१/०९/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार उदगीर

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा**

मा. बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६७२/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Sudam S/o. Gangaram Suryawanshi हे दिनांक २५.११.२०१५ रोजी Haladwadhawana, Tq.Jalkot Dist. latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार
1) Marubai W/o. Sudam Suryawanshi, Age 72 yrs, Occu. Homemaker,
2) Digambar S/o. Sudam Suryawanshi, Age 49 yrs, Occu. Labour,
3) Datta S/o. Sudam Suryawanshi, Age 48 yrs, Occu. Labour,
4) Surykant S/o. Sudam Suryawanshi, Age 41 yrs, Occu. Labour,
All Applicant Res. Haladwadhawana, Tq. Jalkot, Dist. Latur.
यांनी खालील नमुद ४ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1) Marubai W/o. Sudam Suryawanshi | 72 | Wife |
| 2) Digambar S/o. Sudam Suryawanshi | 49 | Son |
| 3) Datta S/o. Sudam Suryawanshi | 48 | Son |
| 4) Surykant S/o. Sudam Suryawanshi | 41 | Son |

अर्जदार याने Sudam S/o. Gangaram Suryawanshi या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Sudam S/o. Gangaram Suryawanshi याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांक २३/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील तारीख ०१/१०/२०२४

ए.बी. सुर्यवंशी
कनिष्ठ लिपीक
४ थे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

एम.एल.सुत्राळे
सहाय्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा**

मा. बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६८४/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Maroti Gangaram Ingle हे दिनांक १७.०२.२००४ रोजी Udgir Tq.Udgir Dist.latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार
1) Datta Maroti Ingle, Age 53 occu : Labour,,
Applicant R/o Udgir, Tal. Udgir, dist.Latur
यांनी खालील नमुद २ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr.No. Name of legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1) Datta Maroti Ingle | 53 | Wife |
| 2) Parvatibai Maroti Ingle | 75 | Son |

अर्जदार याने Maroti Gangaram Ingle या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Maroti Gangaram Ingle याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांक २९/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील तारीख १०/१०/२०२४

ए.बी. सुर्यवंशी
कनिष्ठ लिपीक
४ थे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

एम.एल.सुत्राळे
सहाय्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर








**उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर**
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

**मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय**
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेंद्रे सचिव



यशवंत धाराशिव जिल्हा
मंगळवार दि. ३ ऑगस्ट २०२४
७
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## सेवानिवृत्तीबद्दल प्रा. कल्याणी टोपगे यांचा सत्कार



मुरुम दि.२ (प्रतिनिधी) – येथील नगर शिक्षण विकास मंडळ संचलित प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यरत असलेल्या उपप्राचार्य प्रा. कल्याणी टोपगे यांचा सेवानिवृत्तीबद्दल प्रतिभा निकेतन उच्च माध्यमिक विद्यालयाच्यावतीने सपत्नीक यथोचित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांची सेवा ३३ वर्ष २ महीने झाली आहे. प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते कै. माधवराव (काका) पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माधवराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक सपाटे, उपमुख्याध्याक यु. एस. घुरघुरे, नूतन प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अष्टगी, पर्यवेक्षक विवेकानंद पडसाळगे, के.के. ब्याळे आदी उस्थितीत होते. यावेळी प्रा.ब्याळे उपमुख्याध्याक घुरघुरे व प्रा. टोपगे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी प्रा.विश्वजित अंभर, प्रा.अण्णाराव कांबळे, ब्याळे प्रा.संजय गिरी, प्रा.सुधीर नाकाडे, महामुनी उमाकांत, शाळू राजीव, प्रा.अजित सुर्यवंशी, नारायण सोलंकर, राघवेंद्र धर्माधिकारी, बंडगर बिबिषण, रत्नदीप वाकडे, शोभा पटवारी, रेखा उण्णद, सतीश रामपूरे, दयानंद राठोड, अजित राठोड, अमोल गायकवाड आदीसह माजी प्राचार्य, माजी प्राध्यापक, विद्यार्थी व त्याचे हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. उमाकांत महामुनी यांनी केले तर आभार प्रा.अजित सुर्यवंशी यांनी मानले.

# निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्तीसाठी ११३ कोटींच्या प्रशासकीय मान्यताही मिळेल - आ. पाटील



धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – २३ गावातील शेतकर्यांसाठी अतिशय महत्वपूर्ण असलेल्या निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेची दुरुस्ती आता दृष्टीपथात आहे. डॉ. पद्मसिंह पाटील यांनी भगीरथ प्रयत्नाने केलेला हा प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्याची जबाबदारी आपली आहे. ठाकरे सरकारच्या भूमिकेमुळे सुरुवातीच्या अडीच वर्षात या प्रकल्पाच्या दुरूस्ती बाबत काहीच हालचाल झाली नाही. मात्र आता ११३ कोटी रूपयांच्या दुरूस्ती प्रस्तावास तांत्रिक मान्यता मिळाली आहे. तसेच लवकरच अशक्यप्राय वाटणाऱ्या या कामास प्रशासकीय मान्यताही मिळेल, असा विश्वास आ राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

धाराशिव तालुक्यातील करजखेडा चौरस्त्यावर परिसरातील शेतकऱ्यांसोबत ते संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी यावेळी भाजपा जिल्हा संयोजक नेताजी पाटील, तालुकाध्यक्ष राजाभाऊ पाटील, गट प्रमुख अहमद पठाण, गट प्रमुख बालाजी गावडे, गण प्रमुख लिंबराज साळुंके, भारत डोलारे, वसंत खटके, बलभीम भोसले, लक्ष्मण चव्हाण, राजेंद्र शिंदे, दगडू भोसले, बिभीषण साळुंके, सुधीर भोसले सरपंच करजखेडा, प्रवीण भद्रे सरपंच पाटोदा, गौतम सूर्यवंशी, गोपाळ पाटील सरपंच नांदुर्गा, किशोर पाटील सरपंच भंडारी, काका शेळके सरपंच बामणी, तात्याराव शिंदे, अभिजित पाटील सरपंच केशेगाव, शरद मस्के सरपंच तोरंबा, विठ्ठल बागल, संजय पाटील आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ पाटील म्हणाले की, या महत्वपूर्ण योजनेच्या दुरुस्तीसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आपण स्वतः भेटून निधी उपलब्ध करून देण्यासंबंधी नोव्हेंबर २०२२ मध्ये विनंती केली होती. त्यानुसार त्यांनी जलसंपदा विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. पाच टप्याची असणारी ही योजना गेली अनेक वर्षे बंद असल्याने स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी या तिन्ही विभागांची दुरुस्ती आवश्यक होती. या तिन्ही विभागांकडून अंदाजपत्रक तयार करून घेणे मोठे जिकिरीचे काम होते. अनेक त्रुटींची पूर्तता करून या तिन्ही विभागाच्या समन्वयाने निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या ११३ कोटी रुपये अंदाजपत्रकीय किंमतीच्या कामास तांत्रिक मान्यता मिळवून घेतली आहे. विशेष म्हणजे कोणत्याही महामंडळाला प्रकल्प दुरूस्तीसाठी एकूण तरतुदीच्या १० टक्के निधी खर्च करता येतो. निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरूस्तीसाठी ११३ कोटी रूपयांची आवश्यकता आहे. त्यामुळे या प्रस्तावास खास बाब म्हणून मंजुरी मिळवून घेण्यासाठी आपला पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अशक्यप्राय वाटणारी कामे देखील आपण मिळून यापूर्वीही केलेली असून हे काम देखील पूर्ण करण्याची आपली सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेसाठी पाणी राखीव ठेवण्यात आलेले आहे. डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या दूरदृष्टीमुळे तेंव्हाच या योजनेसाठी ४२दलघमी पाणी आरक्षित करून ठेवण्यात आलेले आहे. या पाणी आरक्षणामध्ये काहीही बदल झालेला नाही, होणारही नाही आणि होवू दिलाही जाणार नाही. मात्र याबाबत जाणीवपूर्वक पसरविण्यात येत असलेल्या गैरसमजाकडे दुर्लक्ष करावे, असे आवाहन त्यांनी केले.

## माजी आमदार ठाकूर यांची उत्कृष्ट भाषण पुरस्कारासाठी निवड



परंडा दि.२ (प्रतिनिधी) – भारतीय जनता पार्टीचे विधान परिषदेचे माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांची राष्ट्रकुल संसदीय मंडळा मार्फत विधान परिषदेतील भाषणाबद्दल २०१८–१९ साठी उत्कृष्ट भाषण या पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते दि.३ सप्टेंबर रोजी दु. ३.३० वाजता मुंबई येथील विधान भवनच्या मध्यवर्ती सभागृहात होणार आहे. या समारंभास महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, विधान सभेचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई नीलम गोऱ्हे व विधानसभा उपसभापती नरहरी झिरवळ हे उपस्थित राहणार आहेत. ठाकूर यांनी विधीमंडळात मराठवाडा आणि धाराशिव जिल्ह्यात सततचा पडणारा दुष्काळ, पाणी टंचाई, मराठवाड्याचे हक्काचे २३.६६ टीएमसी कृष्णा खोऱ्यातील पाणी, शेतकरी कर्ज माफी, जलयुक्त शिवार, शेतीपंपाचा वीज प्रश्न, मराठवाड्याचे मागासलेपण, दरडोई कमी असलेले उत्पन्न, धाराशिव येथील वैद्यकीय महाविद्यालय आदी जनतेच्या जिव्हाळ्याचे अनेक विषय प्रभावीपणे सभागृहात मांडले होते. या पुरस्काराबद्दल ठाकूर यांची सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### टाळ–मृदंगाच्या गजरात ओम नमः शिवायचा जयघोष...

## मिरवणूकीद्वारे मल्लिकार्जुन महाराजांच्या पालखीचा समारोप

मुरुम दि.२ (प्रतिनिधी) – येथील ग्रामदैवत श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन यात्रेनिमित्त मंदिर समितीच्या वतीने श्रीशैल, काशी, उज्जैन पिठाचे संचालक तथा जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, मंदिर समितीचे अध्यक्ष प्रशांत पाटील यांच्या संकल्पनेतून श्रावण मासामध्ये दि. ९ ऑगस्टपासून प्रवचनास प्रारंभ झाला. हुबळी मठाचे मठाधिपती राजशेखर शिवाचार्य महास्वामी यांच्या मधुर वाणीने, पेटीवादक–गायक शिवशरणय्या स्वामी, तबलावादक प्रविण कडंगची यांच्या संगीत सहकार्याने श्रीशैल मल्लिकार्जुन व शिवयोगी श्री सिद्धरामेश्वर महात्मे यांच्या जीवनावर पुराण कथा पार पडली. दि.३१ ऑगस्ट रोजी रात्री १२ वाजून १० मिनिटाला अग्नी पेठवण्यात दि.१ सप्टेंबर रोजी सकाळी भक्तिमय वातावरणात विधिवत पूजन करून पालखीस हनुमान चौकातून सुरवात करुन ग्राम प्रदक्षिणा घालत पारंपारिक खेळ, वाद्याच्या गजरात उत्स्फूर्तपणे भक्तांनी सहभाग घेतला. वरुणराजा बरसत असतानाही श्री मल्लिकार्जुन पालखी सोहळ्याप्रसंगी असंख्य भाविक भक्त तल्लीन झाले होते. बहुसंख्य माता–भगिनी डोक्यावरती कलश घेऊन देवालय समितीने दिलेल्या साड्या परिधान करून ओम नमः शिवाय या जपाचा जयघोष करीत पालखी सोहळ्यात सामील झाल्या होत्या. अष्टगी, लोणी, भोसगे परिवाराच्या घरून वाजत–गाजत कुंभकळस आणण्यात आला. प्रारंभी अग्नी प्रवेश हुनुमान चौकातून श्री कपिलसिद्ध मल्लिकार्जुन पालखी निघून यादरम्यान बहुसंख्य महिला भगिनीच्या डोक्यावर कुंभकलस घेऊन उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या होत्या. शहरातील सोनार गल्ली, अशोक चौक, टिळक चौक, किसान चौक, सुभाष चौक, गांधी चौक या पालखी मार्गावर भाविक भक्तांनी रांगोळी काढून पालखी पूजन व पुष्पवृष्टी करून ठिकठिकाणी स्वागत करण्यात येऊन पालखीचे भक्तांनी दर्शन घेतले. डोंगरे परिवाराकडून भक्तांसाठी दुध तर गांधी चौकातील दुर्गे परिवाराकडून चहापान व्यवस्था करण्यात आली होती. मंदिर समितीच्या वतीने प्रदक्षिणा दरम्यान भक्तांना अल्पउपहार व पाण्याची सोय करण्यात आली होती. सुभाष चौकातून पालखी गांधी चौकाकडे मार्गस्थ झाली त्यावेळी बापुराव पाटील यांनी मल्लिकार्जुन पालखीचे दर्शन घेतले. यात्रेच्या यशस्वितेसाठी प्रशांत पाटील मित्र मंडळाने पुढाकार घेतला. यावेळी संपूर्ण परिसर भाविक भक्तांच्या सहभागाने गजबजून गेला होता.



## गणेशोत्सव स्पर्धेसाठी ५ सप्टेंबरपर्यंत अर्ज स्विकारण्यास मुदतवाढ

धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्यावतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४' चे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांना स्पर्धेत सहभागी होता यावे यासाठी अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख आता ५ सप्टेंबर करण्यात आली आहे. गणेशोत्सव मंडळांनी संपूर्ण भरलेला अर्ज mahotsav.pldagmail.com या ई–मेल आय. डी. वर पाठवणे आवश्यक आहे.

स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. स्पर्धेचा अर्ज पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून स्पर्धा नि:शुल्क आहे. सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धनाकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट, ध्वनी प्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे राज्य शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल. दि.७ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सव स्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम ३ विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २ लाख ५० हजार आणि १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे यांनी केले आहे.



## श्री सिध्दीविनायक परिवाराचा रोलर पूजनाचा कार्यक्रम उत्साहात

धाराशिव दि.२ (प्रतिनिधी) – श्री सिध्दीविनायक परिवातील खामसवाडी येथील श्री सिध्दीविनायक ग्रीनटेक युनिट क्रमांक २ गुळ कारखान्याच्या गळीत हंगाम २०२४–२५ च्या रोलर पूजनाचा कार्यक्रम दि.१ सप्टेंबर रोजी उत्साहात पार पडला.



श्री सिध्दीविनायक परिवाराचे संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी सपत्नीक लक्ष्मी पूजन करून रोलर पूजन केले. यावेळी कुटुंबासह खामसवाडी येथील ग्रामस्थ व कळंब तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ३० जून २०२२ रोजी या कारखान्याची मुहूर्त मेढ रोवण्यात आली होती. त्यानंतर मागील वर्षी प्रथम चाचणी घेऊन कारखाना सुरु करण्यात आला होता. यावर्षी पूर्ण क्षमतेने गाळप केले जाणार असून प्रती दिन दीड हजार मेट्रिक टन उसाचे गाळप करण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी दिली. तर कारखाना परिसरातील लोकांच्या मनात श्री सिध्दीविनायक परिवाराबद्दल विश्वास आहे. तो विश्वास सार्थ ठेवण्याचे काम परिवाराकडून केले जाणार असून ऊस खरेदी नंतर अवघ्या १५ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा केले जातात. नेहमी पारदर्शक व्यवहार केला जाईल असा विश्वास देत मोळी पूजनाच्या कार्यक्रमाला अडीच हजार पेक्षा अधिक शेतकऱ्यांना येथे आमंत्रित करून कारखान्याची कार्यपद्धती समजावून सांगण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी खामसवाडीचे सरपंच अमोल पाटील, भाजपा तालुकाध्यक्ष अजित पिंगळे यांच्यासह इतरांनी सिध्दीविनायक परिवाराबद्दल गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमास मोहेकर उद्योग समूहाचे अध्यक्ष हनुमंत मडके, बालाजी कोरे, उपसरपंच किरण पाटील, सोसायटीचे चेअरमन संजय पाटील, तेरणा कारखान्याचे माजी संचालक दिलीप पाटील, अरुण चौधरी, माणिक बोंदर, सचिन मिनियार, गणेश कामटे, दिनेश कुलकर्णी, राजकुमार जाधव, अरविंद गोरे तसेच कारखान्यातील विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड.नितीन भोसले यांनी केले.

## नळदुर्ग येथील शासकीय विश्रामगृहाची दयनिय अवस्था

### पुर्वीच्या डाक बगल्याकडे आमदार व खासदारांनी लक्ष द्यावे

नळदुर्ग दि.२ (प्रतिनिधी) – नळदुर्ग येथील शासकीय विश्रामगृह गेल्या अनेक वर्षापासून बंद अवस्थेत असल्यामुळे त्याची खुप मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आसल्याचे दिसून येत आहे.

शासकीय विश्रामगृहाच्या आतमधील परिसरात काट्याची झुडपे वाढले असून गवत व पालापाचोळा मोठ्या प्रमाणात साचला आहे. या शासकीय विश्रामगृहाकडे शासनाची पूर्णपणे जाणीवपूर्वक डोळेझाक होत असल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ लगत असलेल्या नळदुर्ग शहर एक ऐतिहासिक शहर आसुन या शहरात प्रशासन आसुन आड थाळा नसुन खोळंबा आशी दयनिय अवस्था या विश्राम गृहाची झाली आसून प्रशासन जाणीव पूर्वक या शहरांतील विश्राम गृहकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे . त्याचबरोबर या ठिकाणी सफाई कामगार शिपाई किंवा चौकीदार नसल्यामुळे या विश्राम गृहाकडे नागरीकांचे येणे जाणे पूर्णपणे बंद झाल्यामुळे काही वर्षां पूर्वी डाक बंगला या नावाने प्रसिद्ध असलेल्या नळदुर्गच्या शासकीय विश्रामगृहाची श्वानासह इतर मोकाट जनावरांचा वावर वाढल्याने विश्रामगृह परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या विश्रामगृहाची तात्काळ दुरुस्ती व स्वच्छता करून विश्रामगृहाला गत वैभव प्राप्त करून द्यावी अशी मागणी होत आहे. नळदुर्ग येथे प्राचीन व ऐतिहासिक किल्ला आहे .

या ऐतिहासिक कल्ल्यात दररोज हजारो पर्यटक पर्यटनासाठी येतात लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री खंडोबा देवस्थान, श्रमदानातून तयार केलेले धाराशिव जिल्ह्यातील सर्वात मोठे बौद्ध विहार आहे .श्री क्षेत्र रामतीर्थ आहे , संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक भक्त नळदुर्ग नानीमाँ सरकार दर्गाहात येतात तसेच नळदुर्ग हे शहर तुळजापूर व अक्कलकोट या तीर्थक्षेत्रांना मध्यवर्ती ठिकाण आहे. त्यामुळे तुळजाभवानी माता व श्री स्वामी समर्थ यांच्या दर्शनाला जाणारे भाविक तसेच ऐतिहासिक किल्ला पाहण्यासाठी येणारे पर्यटन नळदुर्ग शहरात आल्यानंतर विश्रांतीसाठी पूर्वी याच शासकीय विश्रामगृहात आराम घेण्यासाठी थांबत आसत मात्र सध्या हे विश्रामगृह बंद अवस्थेत असल्यामुळे नळदुर्ग शहरात येणाऱ्या पर्यटकासह भाविकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आसल्यचे दिसुन येत आहे या विश्रामगृहामध्ये १ व्हीआयपी सुटसह ४ जनरल सुट आहेत. मात्र सध्या त्याची खुप मोठी दुरवस्था झाली आहे.



या शहराकडे खरे तर धाराशिव जिल्ह्याचे खासदार ओमराजे निंबाळकर व तुळजापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी या पुर्वीच्या डाक बंगल्याच्या इमारती कडे जातीने लक्ष घालून हे ऐतिहासिक शहरातील अनेक वर्षापासुन धुळ खात पडून असलेले विश्रामगृह तात्काळ चालु करण्या संदर्भात आदेश देण्यात यावा आशी मागणी शहरातील नागरीकांनी जोर धरला आहे. नळदुर्ग शहराचा ऐवढा मोठा विकास होतो, मग शासकीय विश्रामगृहाचा का होत नाही ? असे नागरीकांतून बोलले जात आहे. जर हे काम पूर्ण झाले तर शहराला एक गत वैभव प्राप्त होईल.



# यशवंत

मंगळवार दिनांक ०२ सप्टेंबर २०२४

## उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com


# ना. संजय बनसोडे यांनी घेतले उदागिर बाबाचे दर्शन



**उदगीर (प्रतिनिधी)** श्रावणमास सोमवार (सोमवती आवस्या) निमित्त सोमवार दि. ०२ सप्टेंबर रोजी उदगीर येथील ऐतिहासिक किल्ल्यातील उदागिरी बाबांचे राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी पुजा करुन आरती केली,दर्शन घेवून आशिर्वाद घेतला

यावेळी उदागिर बाबा मठसंस्थानच्या वतीने मठाधिश जयेश गिर गुरु सतिश गिर महाराज यांच्या हस्ते ना. संजय बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सोनु महार-ाज, महराष्ट्र एज्युकेशन सोसाटेची सचिव रामचंद्र तिरुके उपस्थित होते.

# राष्ट्रपतीच्या दौऱ्यासाठी उदगीर नगरी सज्ज

## *४ सप्टेंबरला बुद्ध विहार उद्घाटन व महिलांचा आनंद मेळावा*





**उदगीर (प्रतिनिधी)** भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रथम आगमनासाठी ऐतिहासिक उदगीर नगरी सज्ज झाली आहे. चार तारखेला होणाऱ्या बुद्ध विहार उद्धाटन व महिलांच्या आनंद मेळाव्याची तयारी पूर्ण झाली असून उदयगिरी महाविद्यालयाच्या मैदानावर भव्य सभा मंडप उभा राहिला आहे. बुद्ध विहार लोकार्पणासाठी सज्ज असून आज पूर्ण परिस्थितीचा आढावा राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे व जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी घेतला.

राष्ट्रपती महोदयांचा महाराष्ट्राच्या दौऱ्याची आजपासून सुरुवात झाली आहे. बुद्धविहाराचे लोकार्पण व महिलांचा आनंद मेळावा नियोजित वेळेवर व्हावा, यासाठी प्रशासन ताकदीने कामाला लागले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लभार्थी महिलांचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत राज्यातील पहिलाच कार्यक्रम या ठिकाणी होत आहे.

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, त्यांना पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीसाठी चालना देणे ,महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर बनवणे, यासाठी विविध शासकीय योजनांची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनांचा दुसरा टप्पा सुरू झाला आहे.

महाराष्ट्रात प्रथमतः या कार्यक्रमाला राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या स्वागतासाठी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामजिक न्याय राज्यमंत्री, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यासह विविध मान्यवर उदगीरमध्ये पोहचत आहेत.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी आज या आयोजनाच्या शेवटच्या टप्प्यात सर्व कार्यक्रम स्थळांची पाहणी केली. राष्ट्रपतींचा हा पहिलाच उद्गित दौरा असून तो स्मरणीय बनावा यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

कार्यक्रमस्थळी विविध शासकीय विभागांच्या योजनांची माहिती देणारी दालने उभारण्यात येणार आहेत. आज या दालनाची ही पाहणी मान्यवरांनी केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, महिला सन्मान योजना यासारख्या विविध योजनांमधील लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात राष्ट्रपतींच्या उपस्थितीत सन्मानित केले जाणार आहे. राष्ट्रपतींचा थेट संदेश ऐकण्याची संधी या कार्यक्रमात मिळणार असल्यामुळे या कार्यक्रमांची महिला जगतात प्रचंड उत्सुकता आहे.



देवर्जन येथे पंतोजी परिवाराच्या वतीने बैलपोळा उत्साहात साजरा



**मलकापुर ग्राम पंचायतचे सरपंच गुरुनाथ बिरादार यांनी सहकुटुंब सर्जा राजाचे पुजन करुन बैलपोळा साजरा केला.**

# कत्तल करण्याच्या उद्देशाने बांधलेल्या गायी सापडल्या

## शिवसेना कार्यकर्त्यांनी उडकीस आणला प्रकार .. !



**जळकोट (प्रतिनिधी)** शहरातील डांगेवाडी जिल्हा परिषद शाळेच्या जवळ तीन गाई व तीन कालवडी असे एकूण सहा गायी कत्तल करण्यासाठी चारा पाणी न करता बांधलेल्या आढळून आली. याप्रकरणी जळकोट पोलिसांनी एका आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जळकोट येथील शिंदे गटाचे शिवसेनेचे शहर प्रमुख बालाजी थोटे, सचिन भोसले देवा, कल्याण कस्तुरे, जयवंत धूळशेट्टे, परमेश्वर नामवाड, रत्नाकर केंद्रे, वैभव मोहटे, कृष्णा सुरनर, बलराज नाईकवाडे, राहुल मुसळे यांना जळकोट शहरामध्ये गाईची कत्तल करण्यासाठी डांगेवाडी परिसरामध्ये तीन गाई व तीन कालवड बांधून ठेवल्याची माहिती पोलीसांना मिळाल्या नंतर जळकोट पोलीस घटनास्थळी पोहोचले व कत्तल करण्याच्या उद्देशाने बांधून ठेवलेली व चारा पाणी न करता बांधलेल्या गाई आढळून आल्या. सर्व गाईना पोलीस स्टेशनमध्ये आणण्यात आले. पुढील कारवाई होईपर्यंत संगोपन करण्यासाठी घोणशी येथील जगदंबा फ्फाउंडेशन व वर्धिनी गोशाळा येथे पाठवण्यात आले आहेत.

जळकोट पोलीस स्टेशनमध्ये आरोपी शफी खुरेशी रा. जळकोट याचे विरुद्ध हेड कॉन्स्टेबल पद्माकर जायभाये यांच्या फिर्यादीवरून कलम ११ (१) (ड), (ई) प्राण्यास निर्देश प्रतिबंध कायदा १९६० व सह कलम ५ (अ), ५ (ब) ९, ११ महाराष्ट्र पशु संरक्षण सुधारणा अधिनियमन १९९६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल लक्ष्मण नागरगोजे हे करत आहेत.

# उदगीर विधानसभा मतदारसंघाची जागा रि.पा. इं.(आ) ची- सुशीलकुमार शिंदे



**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर राखीव विधानसभा मतदारसंघाची जागा रिपब्लिकन पार्टी ऑफ्फ इंडिया आठवले गटाची आहे अशी भूमिका रिपब्लिकन पार्टी ऑफ्फ इंडिया युवक आघाडी लातूर जिल्हाध्यक्ष सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केली आहे

रिपब्लिकन पार्टी ऑफ्फ इंडिया आठवले गटाची ताकद उदगीर विधानसभा मतदार संघामध्ये असून रिपब्लिकन पार्टी ऑफ्फ इंडिया आठवले महायुतीमध्ये येण्या अगोदर २००९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये माननीय नामदार रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात तिसरी आघाडी म्हणजेच रिडालोस ची स्थापना करण्यात आली होती व तसेच २००९ च्या निवडणुकीमध्ये रिडालोस कडून संपूर्ण महाराष्ट्रात उमेदवार थांबविण्यात आले होते तसेच उदगीर मतदार संघातून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे गौतम भालेराव यांना उमेदवारी देण्यात आली होती त्यावेळी अचानक रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने गौतम भालेराव यांना उमेदवारी देऊन देखील कसलीही पूर्वतयारी नसताना रिपब्लिकन पार्टी ऑफ्फ इंडियाचे उमेदवार गौतम भालेराव यांनी तब्बल १८००० मतदान २००९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये उदगीर मतदार संघात घेतले होते त्यामुळे त्यावेळी सत्ताधारी असलेल्या पक्षाचे उमेदवार मच्छिंद्र कामत यांचा पराभव झाला होता २०१४ विधानसभा निवडणुकीमध्ये माननीय नामदार रामदासजी आठवले साहेब यांच्या पुढाकाराने राज्यामध्ये महायुती तयार करण्यात आली म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष महायुतीचा प्रमुख घटक पक्ष आहे व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ची ताकद उदगीर विधानसभा मतदारसंघांमध्ये असल्यामुळे महायुतीतील उदगीर राखीव मतदार संघाची जागाही रिपाईचीच असल्याची भूमिका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया युवक आघाडीचे लातूर जिल्हाध्यक्ष सुशीलकुमार शिंदे यांनी स्पष्ट केली आहे.

# श्री हावगीस्वामी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित

# राष्ट्रीय आभासी चर्चासत्रास उत्सफूर्त प्रतिसाद

## भारतीय ज्ञान प्रणाली या विषयावर मंथन



**२४ राज्यातून नाव नोंदणी,४७१ लोकांचा सहभाग,१४ राज्यातून १४० शोधनिबंध प्राप्त तर १० राज्यातील अभ्यासकांनी केले शोधनिबंधाचे वाचन.**

**उदगीर (प्रतिनिधी)** श्री हावगीस्वामी महाविद्यालयाच्या वतीने दि.३० व ३१ ऑगस्ट २०२४ रोजी भारतीय ज्ञान प्रणाली : भारतीय संस्कृतीचे पुनर्जागरणफ्या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय चर्चासत्र आभासी पद्धतीने घेण्यात आले. या चर्चासत्रात २४ राज्यातून ४७१ श्रोत्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहभाग नोंदवला. सदरील चर्चासत्रासाठी भारतातून १४० शोधनिबंध प्राप्त झाले असून त्यात महाराष्ट्र, दिल्ली, गोवा, गुजरात, हरियाणा, कर्नाटक, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान, तामिळनाडू, उत्तरप्रदेश, तेलंगण, पश्चिम बंगाल व केरळ या १४ राज्यांचा समावेश आहे. भारतातील १० राज्यातील अभ्यासकांनी विविध सत्रात शोधनिबंधाचे वाचन केले.

उद्घाटन व बीजभाषण, साधन व्यक्ती सत्र, समारोप पाहुणे, व मुक्त संवादाच्या सत्रासह इतर शोधनिबंध वाचण्याचे तीन सत्र अशा सात सत्राच्या माध्यमातून दोन दिवस अभ्यासकांनी भारतीय ज्ञान प्रणालीवर साधक बाधक चर्चा करून महत्वाचे मार्गदर्शन केले. या मान्यवर अभ्यासकांमध्ये प्रो.डॉ.दिव्या जोशी नैनिताल (उत्तराखंड), प्रो.डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन प्र.कुलगुरू, नाशिक (महाराष्ट्र), डॉ.आर.टी.बेद्रे सागर (मध्यप्रदेश), प्रो.रामनाथ झा जेएनयू (नवी दिल्ली), डॉ. स्वाती मुखर्जी कोलकत्ता (पश्चिम बंगाल), डॉ.नीता मेश्राम वर्धा (महाराष्ट्र), डॉ. जे.एन. कुलकर्णी नांदेड (महाराष्ट्र), डॉ.सुधीर निकम ठाणे (महाराष्ट्र), प्रो.ए.डी.शर्मा सागर (मध्यप्रदेश) व प्रो.अनुजा जाधव लातूर (महाराष्ट्र) इत्यादीचा समावेश होता.

भारतीय ज्ञान प्रणालीची प्रासंगिकता, महत्त्व, वैशिष्ट्य व सामर्थ्य तसेच भारतीय ज्ञान प्रणालीतील मूल्य विचार, कला या विषयाच्या अनुषंगाने मान्यवरांनी अतिशय अभ्यासपूर्ण असे संशोधनात्मक पातळीवर विवेचन प्रस्तुत चर्चासत्रात केले. प्रश्नोत्तराच्या माध्यमातून व सहभाग नोंदवून श्रोत्यांनी देखील उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला.

सदरील चर्चासत्र यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड.गुणवंतराव पाटील हैबतपूरकर, सचिव उमेश पाटील देवणीकर, उपाध्यक्ष शिवकुमार हसरगुंडे, संगमेश्वर जिरगे, सहसचिव प्रभूराज कप्पीकेरे, कोषाध्यक्ष शंकरप्पा हरकरे, संस्थेचे सर्व सन्माननीय सदस्य, प्र.प्राचार्य डॉ.एन.जी.एमेकर व उपप्राचार्य डॉ.ए.ए.काळगापुरे यांनी संयोजन समितीचे अभिनंदन केले.

चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी समन्वयक ग्रंथपाल प्रा.अजित रंगदळ, समन्वयक प्रा. ज्योती संपाळे, संयोजक डॉ.म.ई.तंगावार, प्रा. मनोहर भालके, डॉ. विठ्ठल गोरे, प्रा.कोमल घुगे, प्रा.सुदर्शन मसुरे, राजकुमार बोयणे व अक्षय दुवे आदींनी प्रयत्न केले. दोन दिवस चाललेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.ज्योती संपाळे तर आभार प्रा.अजित रंगदळ यांनी मानले.